सायना नेहवालने घेतली निवृत्ती (पान ७ वर)

दैनिक

दिव्य वतन

जनसामान्यांचा बुलंद आवाज

महापौर पदावर शिवसेनेचा दावा (पान ८ वर)

नागपूर, अमरावती, चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, वर्धा, यवतमाळ, अकोला, वाशीम, बुलडाणा, नांदेड, हिंगोली, परभणी, लातूर, धाराशिव, अहिल्यानगर, छ. संभाजीनगर, बीड, जालना, नंदुरबार, धुळे, नाशिक

RNI Number MAHBIL/२५/A०७८१ E-mail : divyawatanngp@gmail.com बुधवार दिनांक २१ जानेवारी २०२६ अंक : १६७ वा वर्ष : २ रे, मूल्य : ३ रुपये, पृष्ठे : ८

महाराष्ट्र भारताच्या भविष्याचे पॉवर हाऊस - मुख्यमंत्री

पहिल्याच दिवशी १४ लाख ५० हजार कोटी गुंतवणूकीचे १९ सामंजस्य करार, पंधरा लाख रोजगार संधी, आयटी, डाटा सेंटर, हरित ऊर्जा क्षेत्रात गुंतवणूक, गतवर्षीच्या टप्पा ओलांडून, यंदा विक्रमी गुंतवणूकीचा विश्वास

दिव्य वतन /वृत्तसेवा

दावोस : - भारतातील उद्योग आणि गुंतवणूक क्षेत्रासाठी महाराष्ट्रच गेटवे-ऑफ-इंडिया' असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विधान खरे ठरवणारे तब्बल १४ लाख ५० हजार कोटींचे गुंतवणूक करार पहिल्याच दिवशी करण्यात आले. या गुंतवणूकीसोबतच राज्यात १५ लाख रोजगार संधी निर्माण होणार आहेत. महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, गुंतवणूक आणि सेवा विभागाच्या माध्यमातून यंदा विविध विभागांनी आणि विविध क्षेत्रातील उद्योगांच्या प्रतिनिधी समवेत मुख्यमंत्री श्री. फडणवीस, उद्योग मंत्री डॉ. उदय सामंत यांच्या प्रमुख उपस्थितीत या सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या केल्या आहेत. हरित ऊर्जा, अन्न प्रक्रीया, पोलाद निर्मिती, आयटी-आयटीईस, डाटा सेंटर्सह ईव्ही- ऑटोमोबाईल, जहाज बांधणी, डीजिटल इन्फ्रा अशा विविध क्षेत्रातील ही गुंतवणूक मुंबईसह राज्याच्या रत्नागिरी, पालघर, गडचिरोली, अहिल्यानगर या भागात पोहचणार असल्याने, तेथे उद्योग वाढीसह मोठ्या प्रमाणा रोजगार निर्मितीला चालना मिळणार आहे.

वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमच्या वार्षिक बैठकीकरिता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उद्योग मंत्री डॉ. उदय सामंत यांच्यासह महाराष्ट्र शासनाच्या विविध विभागाचे प्रतिनिधीमंडळ दावोस येथे उपस्थित आहे. दावोस मधील पहिल्याच दिवसापासून जगभरातील विविध क्षेत्रातील उद्योगांनी महाराष्ट्रात गुंतवणुकीसाठी स्वारस्य दर्शवणे सुरु

केले. यातून गुंतवणुकीचा मोठा ओघ सुरु झाल्याने महाराष्ट्र पॅव्हेलियनमध्ये उत्साहाचे चित्र निर्माण झाले. तत्पुर्वी, दावोस मधील महाराष्ट्र पॅव्हेलियनचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते, उद्योग मंत्री डॉ. उदय सामंत यांच्या उपस्थितीत उद्घाटन झाले.' भविष्याचे वेध घेण्यासाठी सज्ज, विश्वासार्ह आणि दीर्घकाळचा भागीदार म्हणून महाराष्ट्र स्वागत करीत आहे. भारताच्या भविष्याचे पॉवर हाऊस म्हणून महाराष्ट्र जगाला, उद्योग विश्वाला साद घालत आहे, अशी मनोदय भावनाही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केली. सामंजस्य करारांवरील स्वाक्षरी व करारांच्या आदान-प्रदान प्रसंगी झालेल्या चर्चेत मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, 'महाराष्ट्रावरील उद्योग क्षेत्राचा, गुंतवणूकदारांचा हा विश्वास सार्थ ठरविण्यासाठी आम्ही सदैव सज्ज आहोत. येथे होणाऱ्या करारांवरील पुढील कार्यवाहीबाबत वॉर रूमच्या माध्यमातून लक्ष ठेवण्यात येईल. उद्योजकांना आवश्यक सुविधा वेळेत आणि दर्जदार पद्धतीने मिळाव्यात याची काळजी घेतली जाईल, असेही त्यांनी सांगितले. 'उद्योजक –गुंतवणूकदारांकडून मिळत असलेला प्रतिसाद पाहता, यंदा गतवर्षीहून अधिक गुंतवणूक आणि रोजगार संधीचे सामंजस्य करार होतील असा विश्वासही मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला. विशेषतः मुंबईतील घन कचरा व्यवस्थापन, हवा आणि पाणी गुण संनियत्रणाच्या माध्यमातून सर्क्युलर ईकॉनॉमीची संरचना उभी केली जात आहे. तसेच महाराष्ट्र हे अमर्याद संधीचे राज्य आहे. त्याबाबत आणि एमएमआर क्षेत्राच्या विकासासह, तिसऱ्या मुंबईच्या निर्मितीसाठी महाराष्ट्र आर्थिक सल्लागार समितीने आराखडा निश्चित करून दिला आहे. या माध्यमातून व्यवसायाच्या आणि चांगल्या पगाराच्या रोजगार निमिर्तीवर भर दिला जात असल्याचेही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यावेळी म्हणाले. दरम्यान, आगामी दोन दिवसात दावोसमध्ये एआय़, क्वांटम कंम्प्युटींग, डीजिटल इन्फ्रास्ट्रक्चर, यांसह फिनटेक, लॉजिस्टिक्स अँण्ड इन्फ्रास्ट्रक्चर तसेच जहाज बांधणी, ईव्ही, अपारंपरिक ऊर्जा क्षेत्रातील आणखी काही उद्योग घटकांशीही गुंतवणूकीचे सामंजस्य करार होणार आहेत. त्यादृष्टीने त्यांच्या प्रतिनिधींशी, बोलणी -चर्चांच्या फेऱ्या सुरू करण्यात आल्या आहेत.

(पान 2 वर)

महत्त्वाचे...

सस्पेन्स अजून संपलेलाच नाही, ठाकरे गटाचे 4 नगरसेवक गैरहजर

ठाणे : कल्याण डोंबिवली महापालिका निवडणुकीनंतरही राजकीय घडामोडी संपण्याचं नाव घेताना दिसत नाहीत. इथे भाजपला 50 तर शिवसेनेला 53 जागांवर यश मिळालं आहे. शिवसेना ठाकरे गटाला 11 आणि मनसेला 5 जागांवर यश मिळालं आहे. एकही पक्ष 62 हा बहुमताचा आकडा गाठू शकलेला नाही. त्यामुळे भाजप आणि शिवसेनेत 62 हा आकडा गाठण्यासाठी, विशेषत: महापौर आपला व्हावा यासाठी प्रयत्न केले जात आहेत. यामुळेच कल्याण डोंबिवलीत फोडाफोडीच्या राजकारणाला वेग आला आहे. ठाकरे गटाच्या मशाल चिन्हावर निवडून आलेले नगरसेवक मधुर म्हात्रे आणि कीर्ती ढोणे हे अजूनही नॉट रिचेबल आहेत. तर आणखी दोन नगरसेवक हे गटनेता निवडीच्या बैठकीला गैरहजर राहीले. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून गटनेता निवडीची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीचं सर्व नगरसेवकांना निमंत्रण देण्यात आलं होतं. 11 पैकी 9 नगरसेवकांशी संपर्क करुन त्यांना बैठकीचं निमंत्रण देण्यात आलं होतं. तर 2 नगरसेवक हे नॉट रिचेबल असल्याने त्यांच्या घरातील सदस्यांच्या हातात याबाबतची नोटीस देण्यात आली होती. पण तरीही ते बैठकीला आले नाहीत. ते दोन्ही नगरसेवक अद्यापही नॉट रिचेबल असल्याची माहिती आहे.

बापाने काँग्रेस वाढवली, पोरीने वाटोळं केलं

सोलापूर: सोलापूर महानगरपालिका आणि आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या तोंडावर जिल्ह्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. काँग्रेस खासदार प्रणिती शिंदे आणि भाजपचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्यात सध्या जोरदार 'शाब्दिक वॉर' सुरू झाले असून, दोघेही एकमेकांवर टीका करण्याची एकही संधी सोडत नसल्याचे पाहायला मिळत आहे.पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी केलेल्या टीकेला उत्तर देताना खासदार प्रणिती शिंदे यांनी त्यांना 'संधीसाधू' संबोधले. त्या म्हणाल्या, "जयकुमार गोरे हे मूळचे काँग्रेसी आहेत, म्हणूनच त्यांनी काँग्रेस कार्यकर्त्यांसाठी असलेले माझे पत्र वाचले असावे. ते भाजपच्या आमिषाला बळी पडून त्या पक्षात गेले आहेत. सोलापूर हे सुसंस्कृत शहर आहे, बाहेरच्या लोकांनी येऊन इथली पातळी कमी करू नये. काही लोकांच्या डोक्यात सत्ता गेली आहे." प्रणिती शिंदेंच्या टीकेला प्रत्युत्तर देताना पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी थेट सुशीलकुमार शिंदेंचा उल्लेख करत निशाणा साधला. गोरे म्हणाले, "माजी केंद्रीय मंत्री सुशीलकुमार शिंदेंनी आयुष्यभर काँग्रेस वाढवली, अनेकांना सांभाळले. मात्र, प्रणिती शिंदेंनी काँग्रेसचे वाटोळं केले. कार्यकर्त्यांना गरज असताना त्यांनी त्यांना वाऱ्यावर सोडले. केवळ दोन नगरसेवक निवडून आल्यावर त्यांना समाधान वाटतेय आणि ८७ नगरसेवक असलेल्या भाजपवर त्या टीका करत आहेत." प्रणिती शिंदेंनी केलेल्या सन्मानाचा उल्लेख करत गोरेंनी टोला लगावला. "त्यांनी सुरुवातीला माझे नाव खूप सन्मानाने घेतले.

गोव्याची दारू, महाराष्ट्राचे लेबल!:कोल्हापुरात ६२ लाखांची बेकायदेशीर दारू पकडली राज्य उत्पादन शुल्क विभागाची धडक कारवाई

दिव्य वतन /वृत्तसेवा

जिल्हा परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्य उत्पादन शुल्क विभागाने कोल्हापूर जिल्ह्यात मोठी कारवाई करत सुमारे 62.5 लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या मोहिमेत प्रामुख्याने 40 लाख रुपये किमतीची गोवा बनावटीची देशी दारू पकडण्यात आली. विशेष म्हणजे, ही दारू गोव्यात तयार करण्यात आली होती, मात्र त्यावर महाराष्ट्राचे बनावट लेबल लावून ती विक्रीसाठी आणली जात होती. निवडणुकीच्या काळात छुप्या मार्गाने होणारी ही मोठी तस्करी प्रशासनाने उघडकीस आणली आहे.मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार, राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या कागल पथकाने देवगड-निपाणी राज्य महामार्गावरील बसवडे फाटा येथे सापळा रचला होता. यावेळी संशयास्पद वाटणाऱ्या 'टाटा मोटर्स' कंपनीच्या ट्रकची (क्रमांक MH-40-CM-2535) झडती घेण्यात आली. तपासणीदरम्यान ट्रकमध्ये अत्यंत चलाखीने

पुढच्या बाजूला देशी दारूचे बॉक्स लपवण्यात आले होते,

तर मागील बाजूस पोलिसांची नजर चुकवण्यासाठी पिण्याच्या पाण्याचे बॉक्स रचून ठेवल्याचे आढळून आले. ही यशस्वी कारवाई राज्य उत्पादन शुल्कचे निरीक्षक शंकर सीताराम आंबेकर आणि कोल्हापूर भरारी पथक क्रमांक 2 चे निरीक्षक प्रमोद खरत यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. या पथकात दुय्यम निरीक्षक ए. आर. नायकुडे, पी. डी. नागरगोजे, डी. बी. गवळी, सचिन काळेल, लक्ष्मण येडगे, केतन दराडे तसेच गडहिंग्लज विभाग आणि भरारी पथकातील इतर कर्मचाऱ्यांचा समावेश होता. या धडक कारवाईमुळे बेकायदेशीर दारू विक्रेत्यांचे धाबे दणाणले आहेत.तपासणी दरम्यान पथकाला 'रॉकेट देशी दारू' या ब्रँडचे एकूण 1,000 बॉक्स आढळून आले. प्रत्येक बॉक्समध्ये 90 मिली क्षमतेच्या 100 बाटल्या, याप्रमाणे एकूण 1 लाख बाटल्या जप्त करण्यात आल्या आहेत. या बाटल्यांवर अहमदनगरमधील 'प्रकार डिस्टिलरी' असा बनावट लेबल लावण्यात आला असला, तरी ही दारू मुळात गोवा राज्यात तयार करण्यात आली असल्याचे प्राथमिक तपासात उघड झाले आहे. या संपूर्ण कारवाईत दारूसाठा, 20 लाख रुपये किमतीचा ट्रक, पाण्याचे बॉक्स आणि मोबाईल फोन असा एकूण 62,50,500 रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

महाराष्ट्रातील लाडक्या बहिणींसाठी खुशखबर!

दिव्य वतन /वृत्तसेवा

मुंबई : मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेला राज्यभरात प्रचंड मोठा प्रतिसाद मिळाला आहे. राज्यातील जवळपास दोन कोटींपेक्षा जास्त महिलांना या योजनेचा लाभ मिळत आहे. राज्य सरकारकडून अडीच लाखांपेक्षा कमी उत्पन्न असणाऱ्या कुटुंबातील महिलांना लाडकी बहीण योजना अंतर्गत आर्थिक मदत केली जाते. या योजने अंतर्गत महिलांना दर महिन्याला 1500 रुपयांची आर्थिक मदत केली जाते. या योजनेसाठी काही निकष ठेवण्यात आली आहे. तसेच आता निकषांची अंमलबजावणी कठोरपणे केली जात आहे. राज्य सरकारकडून लाभार्थी महिलांना ई-केवायसी करण्याचं आवाहन करण्यात आलं होतं. या ई-केवायसीसाठी तारीखही वाढवण्यात आली होती. आता ई-केवायसीची मुदत संपली आहे. दरम्यान, याच ई-केवायसीबद्दल महत्त्वाची अपडेट समोर आली आहे.

महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी ट्विट करत महत्त्वाची माहिती दिली आहे. "मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेबाबत महत्वाची सूचना! महाराष्ट्रातील महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी, त्यांच्या आरोग्य व पोषणामध्ये सुधारणा करण्यासाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना राबवण्यात येत आहे. या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सर्व लाभार्थ्यांना दिनांक ३१ डिसेंबर २०२५ रोजी पर्यंत e-KYC करण्याची मुदत देण्यात आली होती. तथापि, काही कारणास्तव e-KYC करताना चुकीचा पर्याय निवडण्याची बाब निदर्शनास आली आहे.

महायुतीत भडका; भाजपचे पदाधिकारी आक्रमक; शिंदेसेनेविरोधात पोलिसात जाणार

दिव्य वतन /वृत्तसेवा

मुंबई- मुंबई: मुंबई महापालिका निवडणूक निकालानंतर सत्ता स्थापनेच्या घडामोडी सुरु असताना भाजप आणि शिंदेसेनेत जुंपली आहे. शिंदेसेनेकडून करण्यात आलेल्या आरोपांना भाजपकडून प्रत्युत्तर देण्यात आलं आहे. भाजपच्या पदाधिकाऱ्यांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे. भाजपचे पदाधिकारी शिंदेसेनेच्या विरोधात उद्या पोलीस तक्रार दाखल करणार आहेत. त्यामुळे महायुतीमधील अंतर्गत संघर्ष चिघळल्याचं पाहायला मिळत आहे.शिंदेसेनेचे पराभूत उमेदवार समाधान सरवणकर यांनी भाजपच्या स्थानिक नेत्यांवर काही गंभीर आरोप केले. भाजपच्या स्थानिक टोळीमुळे आपला पराभव झाला, असा स्पष्ट आरोप करत त्यांनी थेट बरखास्तीची मागणी केली. सरवणकर यांनी प्रभाग क्रमांक १९४ मधून निवडणूक लढवली. ठाकरेसेनेच्या निशिकांत शिंदे यांनी त्यांचा पराभव केला. सरवणकर यांची बहीण प्रिया सरवणकर-गुरव यांना प्रभाग क्रमांक १९१ मधून पराभव पत्करावा लागला. विशेष म्हणजे त्यांचाही पराभव ठाकरेसेनेच्याच उमेदवारानं केला. विशाखा राऊत यांनी त्यांना धूळ चारली.शिंदेसेनेच्या आरोपांना मुंबई भाजपमधील दक्षिण मध्यच्या महासचिव अक्षता तेंडुलकर यांनी आकडेवारीसह उत्तर दिलं. 'वॉर्ड १९१ मध्ये भाजपला मानणाऱ्या बूथ १०८ मध्ये

शिवसेना उबाठाच्या उमेदवार विशाखा राऊत यांना ७८ मतं मिळाली. तर प्रिया सरवणकर यांना ३११ मतं मिळाली. तर आणि शिवसेनेचा (शिंदे गट) शाखा प्रमुख जिथे राहतो, त्या बूथमध्ये ठाकरेंच्या उमेदवाराला ४५७ मतं आणि शिवसेनेच्या उमेदवाराला १९२ मतं मिळाली. याचा अर्थ काय आहे? खोटं बोला पण रेटून बोला,' अशी पोस्ट तेंडुलकर यांनी फेसबुकवर केली.यानंतर थोड्याच वेळात तेंडुलकर यांनी फेसबुकवर एक स्क्रिनशॉट शेअर केला. या स्क्रीनशॉटमध्ये 'प्रियाला पाडायचंय, तिकडून मिळाले आहेत,' असा मजकूर आहे. तेंडुलकर यांनी शेअर केलेली पोस्ट कुणाल वाडेकर यांची आहे. त्यांच्या प्रोफाईलला बाळासाहेब ठाकरे यांच्या सोबतचा फोटो आहे. वाडेकर यांनी व्हॉट्स ऍप चॅटचा स्क्रीनशॉट शेअर केला आहे. 'माहीममध्ये भाजप परिवारचे स्थानिक जुने निष्ठावंत पदाधिकारी यांनी खरंच खूप चांगले काम केले व महायुती सोबत शेवट पर्यंत होते. परंतु या चॅटमध्ये उल्लेख केलेले टोळीचा भाई कोण आणि कोणत्या मॅडम भाईचा आदेश पाळत आहेत?', असा सवाल वाडेकर यांनी उपस्थित केला आहे.

मुंबईत मेट्रोच्या पुलाखाली धावत्या बसला आग:पश्चिम द्रुतगती महामार्गावर आगीचे लोळ, वाहतूक विस्कळीत...

दिव्य वतन /वृत्तसेवा

मुंबई- मुंबईची जीवनवाहिनी मानल्या जाणाऱ्या पश्चिम द्रुतगती महामार्गावर आज सकळी एका बसला आज भयंकर आग लागली. सुदैवाने या घटनेत कुणीही जखमी झाले नाही. या घटनेचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला असून, त्यात बसमधून निघणारे आगीचे लोळ वर मेट्रोच्या रुळापर्यंत पोहोचत असल्याचे दिसून येत आहे.

यासंबंधीच्या माहितीनुसार, मालाड पूर्व येथील कुरार व्हिलेज परिसरात मेट्रो लाईन - 7 च्या (रेड लाईन) पुलाखाली आज सकाळी एका धावत्या बसला आग लागली. अपघातग्रस्त बस मालाडच्या दिशेने जात होती. रस्त्यात तिच्या इंजिनमधून अचानक धूर येऊ लागला. त्यानंतर काही क्षणांतच बसने पेट घेतला. बसला आग लागल्याचे लक्षात येताच चालक व वाहकाने तातडीने बसमधील प्रवाशांना तत्काळ खाली उतरवले. त्यानंतर संपूर्ण बस आगीच्या विळख्यात सापडली आणि भस्मसात झाली. आगीचे लोळ वर मेट्रो पुलापर्यंत जात होते.

या आगीमुळे पश्चिम द्रुतगती महामार्गावरील बोरिवलीकडे जाणारी वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली होती. महामार्गावर लांबच लांब वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. आगीचे लोळ मेट्रो रुळांच्या अगदी जवळ पोहोचत होते. त्यामुळे मेट्रो प्रशासनाने खबरदारी म्हणून या मार्गावरून जाणारी मेट्रो सुरक्षित अंतरावर थांबवली होती. त्यामुळे कार्यालयाच्या दिशेने निघालेल्या चाकरमान्यांची चांगलीच गैरसोय झाली. या घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या 2 बंबांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलिसही तत्काळ तिथे पोहोचले.

अग्निशमन दलाच्या जवानांनी शर्थीचे प्रयत्न करून आगीवर नियंत्रण मिळवण्याचे काम केले. पण तोपर्यंत बस पूर्णतः आगीत भस्मसात झाली होती. या आगीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नाही. पण ती शॉर्ट सर्किटमुळे लागली असावी असा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे.

दुसरीकडे, नाशिकमध्ये बस व पिकअपच्या झालेल्या भीषण धडकेत 4 जण ठार व 20 जण जखमी झालेत. सोमवारी पहाटे मालेगाव - मनमाड महामार्गावरील वरहाणे गावालगत ही घटना घडली. हा अपघात एवढा भीषण होता की, पिकअप वाहन थेट बसमध्ये घुसली. सोमवारी पहाटे 3 च्या सुमारास सर्व प्रवासी गाढ झोपेत होते, तेव्हा हा अपघात झाला. वऱ्हाणे फाट्याजवळ दोन्ही

वाहनांचा वेग जास्त असल्याने चालकाचे नियंत्रण सुटले आणि ही भीषण धडक बसली.

अपघाताचा आवाज ऐकताच परिसरातील स्थानिक नागरिकांनी तातडीने मदतीसाठी धाव घेतली. पिकअपचा चक्काचूर झाल्याने त्यातील प्रवाशांना बाहेर काढण्यासाठी पोलिसांना आणि ग्रामस्थांना शर्थीचे प्रयत्न करावे लागले. सर्व जखमींना तातडीने मालेगाव येथील सामान्य रुग्णालयात हलवण्यात आले आहे. गंभीर जखमींची प्रकृती चिंताजनक असल्याने मृतांचा आकडा वाढण्याची भीती व्यक्त होत आहे.

रोहिणी पाटील रामटेके यांना राष्ट्रीय पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत सुवर्णपदक

नागपूर : नागपूर येथील रहिवासी व पी टी पाटील यांच्या कन्या रोहिणी पाटील रामटेके यांनी 7 ते 11

जानेवारी 2026 रोजी फरीदाबाद (हरियाणा) येथे पार पडलेल्या राष्ट्रीय इक्विप्ट बेंचप्रेस स्पर्धेत पुण्याच्या रोहिणी रामटेके यांनी सुवर्णपदक प्राप्त करून त्यांचे कोच इंटरनॅशनल पॉवरलिफ्टर ज्योती भादेकर यांच्या मार्गदर्शनाखाली जी 99 फिटनेस ॲन्ड स्पोर्ट्स अकॅडमी नऱ्हे येथे सराव करत आहेत. या अकॅडमी मध्ये पॉवरलिफ्टिंग चे विशेष प्रशिक्षण दिले जाते. वयाच्या 43 व्या वर्षी रोहिणी यांनी बेंचप्रेस प्रकारात 63 किलो वजनी गटात 92.5 किलो वजन उचलून इतर स्पर्धकान पेक्षा 20 किलो पेक्षा जास्त फरकाने विजय मिळवत सुवर्ण पदक मिळवले. आपल्या यशाचे श्रेय त्यांनी प्रशिक्षक ज्योती मॅडम आणि आपल्या कुटुंबियांना दिले आहे. तसेच त्यांचा यशामागे आर्यन म्हस्के गिरीश बिंजवे तसेच संपूर्ण टीमचंही मोलाचे योगदान लाभले.

महाराष्ट्र भारताच्या भविष्याचे पॉवर हाऊस – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

(पान 1 वरून)

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार गतवर्षी स्थापन करण्यात आलेल्या महाराष्ट्र उद्योग, व्यापार आणि गुंतवणूक सुविधा कक्ष (MAITRI) या गुंतवणूक आणि उद्योग सुलभतेला प्रोत्साहन देणाऱ्या समर्पित संस्थात्मक व्यवस्थेमुळे यंदा गुंतवणूकदार, उद्योग क्षेत्राचा महाराष्ट्राकडील ओघ आणखी वाढला आहे.

सामंजस्य करार पुढीलप्रमाणे...
महाराष्ट्र सरकार–काल्सबर्ग
क्षेत्र: अन्न प्रक्रिया आणि कृषी
गुंतवणूक: ५०० कोटी
रोजगार : ७५०
महाराष्ट्र सरकार– योकी ग्रीन एनर्जी प्रा. लि.
क्षेत्र: नविनिकरणीय ऊर्जा
गुंतवणूक: ४ हजार कोटी
रोजगार : ६ हजार
ठिकाण: पालघर/एमएमआर
महाराष्ट्र सरकार–बीएफएन फॉर्जिंग्स
क्षेत्र: स्टील
गुंतवणूक: ५६५ कोटी
रोजगार : ८४७
ठिकाण: पालघर/एमएमआर
एमएमआरडीए–सुमिटोमो रियालिटी
गुंतवणूक: सुमारे ८ बिलियन डॉलर्स
रोजगार : ८० हजार.
एमएमआरडीए–के. रहेजा
गुंतवणूक: सुमारे १० बिलियन डॉलर्स
रोजगार : एक लाख.
एमएमआरडीए–अल्टा कॅपिटल/पंचशील
गुंतवणूक: सुमारे २५ बिलियन डॉलर्स
रोजगार : २ लाख ५० हजार.
एमएमआरडीए–एसबीजी समूह
क्षेत्र: लॉजिस्टिक्स
गुंतवणूक: सुमारे २० बिलियन डॉलर्स
रोजगार : ४ लाख ५० हजार.
एमएमआरडीए–आयआयएसएम ग्लोबल
गुंतवणूक: सुमारे ८ बिलियन डॉलर्स
रोजगार : ८० हजार.
एमएमआरडीए–जायका
धोरण आणि स्ट्रॅटेजी पार्टनर
एमएमआरडीए–सेम्बकॉर्प डेवलपमेंट लि. सिंगापूर
एकीकृत इंडस्ट्रियल पार्कसाठी नॉलेज पार्टनर
एमएमआरडीए–टेक्निकल युनिव्हर्सिटी, मुनीच, जर्मनी
शाश्वत नागरी वाहतूक प्रणाली
महाराष्ट्र सरकार–सुरजागड इस्पात
क्षेत्र: स्टील
गुंतवणूक: २० हजार कोटी
रोजगार: ८ हजार.
ठिकाण: गडचिरोली
महाराष्ट्र सरकार–लोढा डेव्हलपर्स
क्षेत्र: आयटी, डेटा सेंटर्स
गुंतवणूक: १ लाख कोटी
रोजगार: १ लाख ५० हजार.
ज्यांनी महाराष्ट्रात आणखी गुंतवणूक आणि विस्तार करण्याची तयारी दर्शवली असे: कोकाकोला, आयकिया, स्कोडा ऑटो.
याशिवाय, कार्लसबर्गचे सीईओ जेकब अँडरसन यांनी महाराष्ट्रातील गुंतवणूकीला पोषक वातावरणाचे कौतुक करताना राज्याच्या उद्योग धोरणाला दाद दिली. कंपनी लवकरच भांडवली बाजारात आयपीओ आणण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी कोका–कोला कंपनीचे सीनिअर व्हाईस प्रेसिडेंट मायकेल गोल्टझमन यांच्या समेवत देखील मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी गुंतवणुकीच्या अनुषंगाने चर्चा झाली.

निधन वार्ता

पायोनियर वुड्स, वानाडोंगरी येथील रहिवासी सौ सुषमा चंद्रकांत कोल्हेकर यांचे हृदयविकाराने सोमवारी रात्री निधन झाले. त्या ६९ वर्षाच्या होत्या. त्यांचे पश्चात पती, विवाहित मुलगी, सुरभी,जावई व बराच मोठा आप्तपरिवार आहे. अंत्यसंस्कार मंगळवारी वानाडोंगरी येथे पार पडले.

महादुला सर्व्हिस रोडवर अवैध अतिक्रमणामुळे वाहतुकीचा खोळंबा

प्रशासनाने तातडीने कारवाई न केल्यास जनहित याचिकेचा इशारा

दिव्य वतन /तालुका प्रतिनिधी

कोराडी : महादुला येथील नॅशनल हायवेवरील सर्व्हिस रोडवर अवैध दुकानदारांनी सुमारे ५ फूट जागा बळकावल्यामुळे वाहतुकीला मोठा अडथळा निर्माण झाला आहे. नॅशनल हायवे अथॉरिटी ऑफ इंडिया (NHAI) कडून मुख्य रस्ता तसेच सर्व्हिस रोड नागरिकांच्या सुरक्षित आणि सुरळीत वाहतुकीसाठी बांधून देण्यात आला असतानाही बाजारपेठेतील काही व्यापाऱ्यांनी आपली दुकाने, पानटपऱ्या व खाद्यपदार्थांचे स्टॉल थेट सर्व्हिस रोडवर वाढवले आहेत. यामुळे विशेषतः रविवारी प्रचंड वाहतूक कोंडी होत असल्याचे चित्र आहे. प्राणीमित्र संघटनेचे नागपूर अध्यक्ष दादू गणवीर यांनी याबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. त्यांनी सांगितले की, महादुला सर्व्हिस रोडवर दोन्ही बाजूंना व्यापारी प्रतिष्ठाने असून, त्यात अवैध पानटपऱ्या, चाटवाले, बिर्याणी सेंटर्स आणि भाजीपाला विक्रेत्यांनी थोडीथोडी जागा अतिक्रमित केली आहे. परिणामी दुचाकीस्वार, नोकरदार वर्ग, विद्यार्थी आणि विद्यार्थिनींना सायकल व दुचाकी चालवताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. रविवार तसेच इतर दिवशी कॉलनी गेट, वॉल कंपाऊंडलगत असलेल्या भाजीपाला दुकाने व खाद्य स्टॉलमुळे रस्त्यावर प्रचंड गर्दी होते. कधी कधी तब्बल एक तासापर्यंत रस्ता तुडुंब भरून राहतो आणि वाहतूक ठप्प होते. अशा परिस्थितीत एखाद्या निरपराध नागरिकाचा अपघात झाला तर त्याची जबाबदारी कोण घेणार, असा सवालही गणवीर यांनी उपस्थित केला.

या प्रकरणी महादुला नगरपंचायतीने तसेच स्थानिक सी.ओ. यांनी तात्काळ उपाययोजना कराव्यात, अन्यथा कलेक्टर, डीजीपी व मुख्य पोलीस महानिरीक्षकांकडे जनहित याचिका दाखल करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला. दरम्यान, महादुला नगरपंचायतीचे विद्यमान मुख्य अधिकारी अमर हांडा यांनी यावर प्रतिक्रिया देताना सांगितले की, यापूर्वी या ठिकाणी तीन ते चार सी.ओ. बदलून गेले आहेत. आपण पदभार स्वीकारल्यानंतर या प्रकरणी नॅशनल हायवेच्या अधिकाऱ्यांसोबत बैठक घेण्यात आली असून त्यांनी संबंधित जागेचे डिमार्केशन करून दिले आहे. मात्र ही जागा नॅशनल हायवे अथॉरिटीच्या अधिकारक्षेत्रात येत असल्याने त्यांच्याकडून कारवाई अपेक्षित आहे. जर नगरपंचायतीच्या हद्दीत अतिक्रमण आढळले तर टाउन प्लॅनिंगचा नकाशा तपासून तातडीने कारवाई करण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले आहे. महादुला सर्व्हिस रोडवरील वाढते अतिक्रमण आणि त्यामुळे निर्माण होणारा वाहतुकीचा प्रश्न लक्षात घेता, प्रशासनाने समन्वय साधून तात्काळ ठोस पावले उचलण्याची गरज नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

राष्ट्रीय अबॅकस स्पर्धेत मौदा केंद्राचा विजय

अहिल्या जी चॅम्प अबॅकस चे यश

मौदा - नुकतेच नागपूर येथील श्रीमती राधिकाताई पांडव कॉलेज ऑफ इंजीनियरिंग येथे राष्ट्रीय पातळीवर जी चॅम्प अबॅकस स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. त्यात नागपूर व इतर जिल्ह्यातील एकूण 750 विद्यार्थी सहभागी झाले होते. अहिल्या जी चॅम्प अबॅकस कळमेश्वर-मौदा केंद्राच्या एकूण 85 विद्यार्थ्यांपैकी 50 विद्यार्थ्यांना यश प्राप्त झाले. या स्पर्धेत सुपरस्टार, प्रथम, द्वितीय व तृतीय स्थान पटकावणाऱ्या विद्यार्थ्यांना ट्रॉफी, मेडल व प्रमाणपत्र देऊन सन्मानीत करण्यात आले.मीना ठाकरे, विहान काळबांडे, शाक्य हिरेखन, मयंक तिजारे, पारस धुर्वे, अथर्व मेहुणे, आरोही अतकरी, वेदांत सावनेरे, ज्ञानेश भाकरे, रोशन रामटेके, उज्वल अवजे हे विद्यार्थी सुपरस्टार ठरले.

विराज वाहने, रत्नशिल बनसोड, प्रिया डाखोळे, आरव डाखोळे, निर्वी परमार, पूर्वी चोरे, अनवी वासनिक, पार्थ वासनिक, प्रद्युम्न चोरे, हेयांश मेहुणे, नियती वानखेडे, हर्षल चुनारकर, रुद्र नाखले, डोरी करमरकर, साची पाटील, जानवी मेश्राम, रौनित मनोहरे, संयम आमगावकर या विद्यार्थ्यांनी प्रथम, द्वितीय व तृतीय स्थान पटकावले.जी चॅम्प अबॅकसचे संचालक योगेश देशमाने व संचालिका आरती देशमाने यांनी अहिल्या जी चॅम्प अबॅकस च्या शिक्षिका रोशनी निखाडे यांना उत्कृष्ट शिक्षिका तसेच त्यांच्या केंद्राला उत्कृष्ट केंद्र पुरस्कार देऊन गौरविण्यात करण्यात आले.अहिल्या जी चॅम्प अबॅकस कळमेश्वर मौदा केंद्राला प्राप्त झालेल्या यशात शिक्षिका रोशनी निखाडे, सहशिक्षिका तनुश्री निखाडे यांचे मार्गदर्शन, विद्यार्थ्यांची मेहनत, पालकांचे सहकार्य व विश्वासाचा मोलाचा वाटा आहे.

विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या घवघवीत यशामुळे अहिल्या जी चॅम्प अबॅकस चे सर्वत्र कौतुक होत आहे.

कर्नल डॉ. नारायण देशमुख यांनी लिहिते राहावे -डॉ. श्रीपाद जोशी

दिव्य वतन /जिल्हा प्रतिनिधी

नागपूर : अर्धशतकाहून अधिक काळ अमेरिकेत असूनही मराठीत लेखन करणारे कर्नल डॉ. नारायण जयरामराव देशमुख (मूळ राजुरा निवासी) यांनी आपले लेखन जारी ठेवावे, अशी अपेक्षा मराठी साहित्य महामंडळाचे माजी अध्यक्ष डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी यांनी व्यक्त केली आहे.

कर्नल डॉ. देशमुख यांची 3 मराठी पुस्तके प्रकाशित झाली आहेत. अमेरिकेतील मराठी कर्नल, देशाटनाची शतपावली आणि दलाई लामांवरील "शांतिदूताचा दर्शनयोग" ही तीनही पुस्तके नागपूरच्या लाखे प्रकाशनाने प्रकाशित केली आहेत. यातील देशाटनाच्या पुस्तकाला डॉ. जोशी यांनी दीर्घ प्रस्तावना लिहून दिल्याबद्दल देशमुखांनी

परवा त्यांची भेट घेऊन त्यांचे आभार मानले.

देशाटनाचे शतक आपण ओलांडले (102 देश) आणि आज 88 व्या वर्षी सुद्धा आपण ठणठणीत आहात. या प्रवासाच्या माहितीसह वैद्यकीय व्यवसाय, अमेरिकेतील जनजीवन आदी

विषयांवरही आपण मराठीत लिहीत राहावे. त्यांचे संकलन वाचनीय ठरेल, असे डॉ. जोशी यांनी सुचवले.

यावेळी झालेल्या चर्चेत ज्येष्ठ पत्रकार विनोद देशमुख, कवयित्री मेघना वाहोकर, डॉ. विलास देशपांडे, खामगावचे पत्रकार डॉ. राजेश राजोरे आदी सहभागी झाले होते.

श्री गणेश मंदिर टेकडी गणेश जयंतीनिमित्य भव्य शोभायात्रा 22 जानेवारीला

दिव्य वतन /जिल्हा प्रतिनिधी

नागपूर : श्री गणेश मंदिर टेकडी च्यावतीने गुरूवार दि. 22 जानेवारी 2026 रोजी, सायंकाळी 5 ते रात्री 8 पर्यंत श्री गणेश जयंतीनिमित्त याहीवर्षी 22 जानेवारी ला गणेश यागाचे आयोजन मंदिराचे वेदमूर्ती आचार्य श्री. यज्ञेश दिक्षित, पं. संकेत देशमुख, पं. विश्वनाथ शर्मा, ब्रम्हवृद अंहुश व्यास, शंभू टानपे, अजिंक्य कुळकर्णी, निलेश शर्मा, रघुनाथ शर्मा, यांच्या पौरोहित्या खाली करण्यात येणार आहे. गणेश यागाचे प्रमुख यजमान श्री अभिषेक अग्रवाल सपत्नीक असून दि. 21 जानेवारी रोजी सकाळी 9 वा. गणेश यागात श्री गणेश पूजन व नवग्रह पूजन, वास्तू पूजन होऊन गणेश यागाच्या हवनास सुरूवात होईल व दि. 22 जानेवारीला दुपारी 12 वाजता. श्री गणेश यागाची पुर्णाहुती होईल. याप्रसंगी "श्री" ना फुलांची आकर्षक शेज करण्यात येणार आहे. तसेच मंदिरातर्फे तीळाच्या रेवडीचे प्रसाद वितरण करण्यात येईल. दरवर्षी प्रमाणे मंदिरातर्फे भव्य शोभायात्रेचे आयोजन करण्यात येत असून यांत भक्तांचा उत्स्फुर्त सहभाग व सहकार्य लाभते. यानिमित्य शोभायात्रा समितीचे गठण करण्यात आले आहे. ही शोभायात्रा सांयकाळी 5 वाजता गणेश मंदिरातून निघेल. मानस चौकातून अन्सारी रोड, राजस्थानी महीला मंडळ पासून मॉरेस कॉलेज टि पाईंट ते व्हेरायटी चौक, सिताबर्डी मेन रोड, लोखंडी पूल ते मानस चौक मार्गे श्री गणेश मंदिर येथे रात्री 8 वाजता विसर्जित होईल. श्री गणेश जयंतीनिमित्य शोभायात्रेत भव्य श्री चा रथ व आकर्षक झाँकी, घोडा, बॅन्ड, ढोलताशा पथक, विद्युत रोषनाई, तसेच मंगल कलश पथकाचे आयोजन केले आहे. बर्डी मेन रोडवरील व्यापारी वर्गाचे सहकार्य असते. श्री गणेश मंदिरा तर्फे रविवार दि. 25 जानेवारी 2026 रोजी दुपारी 1 ते 4 पर्यंत महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. भक्तांनी अवश्य प्रसादाचा लाभ घ्यावा. असे आवाहन कार्यकारीणी मंडळातर्फे करण्यात येत आहे.

संत ताजुद्दीन बाबांचा जन्मोत्सव सोहळा वाकी येथे 21 ते 27 जानेवारी दरम्यान

दिव्य वतन /तालुका प्रतिनिधी

सावनेर -दरवर्षीप्रमाणे वाकी येथील दर्ग्यावर संत ताजुद्दीन बाबांचा जन्मोत्सव सोहळा साजरा करण्यात येणार आहे. या जन्मोत्सवानिमित्त २१ ते २७ जानेवारी दरम्यान विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या कालावधीत दर्ग्यावर दर्शनासाठी भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होत असून, सर्व

धर्मीय भाविक भक्तिभावाने हजेरी लावत असतात. जन्मोत्सव काळात दररोज धार्मिक विधी,चादर चढविणे व विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती आयोजक प्रभाकर डहाके पाटील यांनी दिली आहे.

प्रभाग 17 मधील काँग्रेस उमेदवारांच्या विजयात आंबेडकरी रिपाई कार्यकर्त्यांचा मोठा वाटा ! ॲड सुरेश घाटे

दिव्य वतन /जिल्हा प्रतिनिधी

नागपूर- राष्ट्रीय रिपब्लिकन जनमोर्चा च्यावतीने घाटे यांच्या अध्यक्षतेत आज पत्रकार परिषद घेण्यात आली.

त्यावेळी त्यांनी सांगितले की, नागपूर महानगरपालिकेच्या 2026 च्या निवडणुकीत मला उमेदवारापासून वंचित ठेवल्या गेले. परंतु प्रभाग 17

मध्ये काँग्रेस उमेदवारांच्या विजयात आंबेडकरी रिपाई कार्यकर्ताचा मोठा वाटा आहे.

असे सुद्धा त्यांनी पत्रकारांना सांगितले. यावेळी मंचावरील एडवोकेट सुरेशचंद्र घाटे सुखदेवराव मेश्राम उर्फ मामासाहेब, मंगेश किसन वानखेडे, राजेश पाटील, महेश नगराळे व भागवत लांडगे यांची उपस्थिती होती.

महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघाचे जिल्हा अधिवेशन उत्साहात संपन्न

कंत्राट दार विरहित रोजगार व समान काम, समान वेतन ठराव एकमताने मंजूर

दिव्य वतन /जिल्हा प्रतिनिधी

नागपूर- सुकेश गुर्वे यांची नागपूर झोन अध्यक्षपदी निवड. अभिजित माहुलकर झोन सचिव योगेश सायवानकर कोषाध्यक्ष, सागर साबळे संघटन मंत्री, मुकेश पाथ्रीकर कार्याध्यक्ष या पदावर निवड करण्यात आली. महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघ संलग्न भारतीय मजदुर संघ यांचे नागपूर जिल्हा अधिवेशन उत्साहपूर्ण व शिस्तबद्ध वातावरणात यशस्वीरित्या पार पाडले. अधिवेशनाची सुरवात प्रतिमांचे पूजन, श्रमिक गीत, व महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघ जिंदा, भारतीय मजदुर संघ जिंदाबाद या जोषपूर्ण घोषणांनी करण्यात आली. सर्व मान्यवरांचे स्वागत करून प्रास्ताविक सादर करण्यात आले. या अधिवेशनास उद्घाटक स्थानी राजेश पोफळी झोनल सचिव महाराष्ट्र वीज कामगार महासंघ, व तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष शंकरराव पहाडे महामंत्री सेवानिवृत्त जेष्ठ नागरिक संघ महाराष्ट्र प्रदेश, व या कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते निलेश खरात प्रदेश अध्यक्ष महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघ हे लाभले, उपस्थित सर्व मान्यवरांनी कामगारांना मार्गदर्शन केले. अधिवेशनात संघटनेचे प्रदेशाध्यक्ष निलेश खरात यांनी मार्गदर्शन करतांना कंत्राटी कामगारांना नोकरी स्थैर्य कंत्रालदार विरहित रोजगार व समान काम समान वेतन मिळावे यासाठी आग्रही असल्याचे स्पष्ट केले यामागण्यासाठी कायदेशीर लढा तसेच आवश्यक असल्यास रस्त्यावर उतरून आंदोलन करण्यासाठी नागपूर जिल्ह्यातील सर्व कामगारांनी सज्ज राहावे असे आवाहन त्यांनी यावेळी केले. अधिवेशनात जिल्ह्यातील कंत्राटी कामगारांच्या गंभीर समस्या अडचणी व त्यावरील ठोस उपाययोजनांवर सविस्तर व सकारात्मक चर्चा झाली, जिल्ह्यातील संघटनात्मक स्थिती सदस्य नोंदणी व वर्गणी सुरू असलेली न्यायालयीन प्रकारले तसेच दैनंदिन बाबत काटेकोर व पारदर्शक अमलबजावणी करण्याचा ठाम निर्णय अधिवेशनात एकमताने 17 जानेवारी 2026 रोजी घेण्यात आला. प्रमुख वक्त्यांनी मार्गदर्शन करताना वीज क्षेत्रातील कंत्राटी कामगारांवर होत असलेल्या अन्यायाविरुद्ध

संघटित व तीव्र लढा उभारण्याचे आव्हान केले भारतीय मजूर संघाच्या विचारधारेनुसार संघटन संघर्ष व संवाद या मार्गाने कामगारांचे प्रश्न सोडवले जातील असा विश्वास व्यक्त करण्यात आला. कार्यक्रमाच्या शेवटी प्रदर्शन करण्यात आले. त्यानंतर उपस्थितांसाठी चहा व भोजनाची व्यवस्था केली. अधिवेशनाच्या प्रसंगी सुकेश गुर्वे, अभिजीत माहुलकर, सागर साबळे, योगेश सावकर, मुरलीधर मांजरेकर, मुकेश पात्रीकर, अमोल धोटे, ज्ञानेश्वर कुडके, जावेद खान, गोपाल कुरील, सौरभ वैरागडे, हेमंत भांडारकर, सौरभ गायकवाड, सुनील जिचकार, यांच्यासह जिल्ह्यातील विविध तालुक्यातील पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. या अधिवेशनास 300 पेक्षा अधिक कंत्राटी वीज कामगारांची उपस्थिती यावेळी होती.

महत्त्वाचे...

राजकिय सुडापोटी दलित कुटुंबाला रेशन देण्यास नकार

नागपूर- सत्यफुला पुष्पराज मेंढे रा. हनुमान नगर बुटीबोरी ता. नागपूर ग्रामीण यांना बुटीबोरी नगरपरिषदेला मुलानें उमेदवार म्हणून नामांकन दाखल केल्यापासून म्हणजे गेले दोन महिन्यापासून रेशन दुकानदार सुजात अकबरभाई शेख यांनी रेशन देण्यास नकार दिला आहे. ही अत्यंत गंभीर बाब असून त्या रेशन दुकानदारांवर कारवाई करण्यासाठी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे जिल्हा सचिव अरूण लाटकर व कैलास मडावी यांनी दि. 20 जानेवारी रोजी सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी यांना निवेदन दिले. दलितांनी प्रस्थापित व्यवस्थे विरूध्द आवाज उचलल्यास त्याचे असेही परिणाम होवू शकतात याचे हे ज्वलंत उदाहरण आहे. मेंढे कुटुंब अत्यंत गरिब असून त्यांचेजवळ रेशनचे बीपीएल कार्ड आहे.दुकान जरी सुजातचे असले तरी त्यांचे भाउ सरफराज शेख हेच दुकानाचा सर्व व्यवहार पाहतात. सरफराज शेख हे गेले दोन वेळा बुटीबोरी नगरपरिषदेत नगरसेवक म्हणून निवडून आले आहेत. नुकत्याच पार पडलेल्या नगरपरिषद निवडणूकीत त्यांच्या पत्नी निवडून आल्या आहेत. मेंढे परिवारातील आकाश पुष्पराज मेंढे यांनी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षा च्यावतीने दलित राखीव जागेसाठी निवडणूक लढली व त्यात ते पराभूत झाले. नामांकन दाखल केल्यापासूनच त्याचे परिवाराला सांगून रेशन बंद करण्यात आले. याआधी गेले 5 वर्षाहून अधिक काळ त्यांना याच दुकानातून रेशन देण्यात येत आहे. तसेच दुसरीकडे गेले अनेक वर्षे त्यांना अर्धेच धान्य (40 किलोऐवजी 20 किलो) देण्यात येत होते.त्याचे सोबत याबाबतीत आकाश मेंढे यांचेशी झालेल्या संभाषणातून राजकिय व जातीयवाद फैलावणारे असे आरोप शेख यांनी केले आहेत. प्रशासनाने देखील या प्रकरणाची गंभीर दखल घेवून कारवाई करण्याची मागणी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने केली आहे.

निशिकांत मायी यांच्या पुस्तकाचे प्रकाशन बुधवारी

नागपूर - दैनिक तरुण भारतच्या आकांक्षा पुरवणीत प्रकाशित 'अशी पाखरे येती' या निशिकांत मायी यांच्या लेखांच्या संग्रहांचे प्रकाशन बुधवार, 21 जानेवारीला दुपारी 4 वाजता रामदासपेठेतील दै. तरुण भारतच्या संस्कृती सेलिब्रेशनमध्ये आयोजित करण्यात आला आहे. इको बॅलन्स फाऊंडेशनचे संचालक नितीन मराठे यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या कार्यक्रमाला ज्येष्ठ पक्षी अभ्यासक डॉ. अनिल पपळापुरे, कृषी शास्त्रज्ञ डॉ. चारुदत्त मायी प्रमुख पाहुणे राहतील. या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन श्री नरकेसरी प्रकाशन लिमि. व स्मिता मायी यांनी केले आहे.

भारतीय ज्ञान महोत्सवात ज्ञान परंपरेवर आधारित प्रतिकृती 30 शाळांमधील 35 परीक्षकांनी केले विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

अकोला - पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या "ज्ञान भारतम्' संकल्पनेला तसेच केंद्र शासनाच्या भारतीय ज्ञान प्रणाली उपक्रमाला बळ देणारा भारतीय ज्ञान महोत्सवांतर्गत बक्षीस वितरण सोहळा रविवारी बाभुळगाव येथे पार पडला. अवनी ग्लोबल फाउंडेशन व दीप अँटीक्स म्युझियम यांच्या संयुक्त विद्यमाने १ ते १० जानेवारी या कालावधीत जिल्ह्यातील विविध शाळांमध्ये हा उपक्रम राबवण्यात आला. पारितोषिक वितरण सोहळ्याची सुरुवात आशिष उमाळे यांच्या बासरी वादनाने करण्यात आली.

मेहनत, सातत्य आणि संस्कारातूनच यशाचे शिखर गाठा - आ. सुधीर मुनगंटीवार यांचे विद्यार्थांना आवाहन

संस्कारातून यशाकडे हिच लोकमान्य संस्थेची अमृत परंपराभद्रावतीत लोकमान्य संस्थेच्या अमृत महोत्सवी वर्षाचा भव्य समारोपीय सोहळा

दिव्य वतन /जिल्हा प्रतिनिधी

चंद्रपूर - शिक्षण देणाऱ्या अनेक संस्था असतात; मात्र स्वर्गीय निलकंठराव गुंडावार यांनी स्थापन केलेली लोकमान्य संस्था ही केवळ पदव्या बहाल करणारी न राहता संस्कार, मूल्ये आणि चारित्र्यनिर्मितीची भक्कम परंपरा जपणारी संस्था ठरली असल्याचे मत आमदार मुनगंटीवार यांनी व्यक्त केले. या संस्थेत शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांनी सातत्यपूर्ण मेहनत आणि संस्कारांच्या बळावर यशाचे शिखर गाठावे, असे प्रेरणादायी आवाहन राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य मंत्री आ. सुधीर मुनगंटीवार यावेळी केले.

भद्रावती येथील लोकमान्य विद्यालय तथा कनिष्ठ महाविद्यालय आणि लोकमान्य ज्ञानपीठ यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित समारोपीय कार्यक्रम उत्साहात पार पडला.प्रमुख अतिथी म्हणून राज्यसभेचे माजी खासदार विजय दर्डा उपस्थित होते.यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी चंद्रकांत गुंडावार होते. यावेळी बळवंतराव गुंडावार, मनोहरराव पारधे, नामदेवराव कोल्हे, उमाकांत गुंडावार, उल्हास भास्करवार, गोपाळराव ठेंगणे, अमित गुंडावार, रूपचंद धरणे, आशिष गुंडावार, सचिन सरपटवार, सौ. पूनम ठावरी यांच्यासह संस्थेचे सर्व पदाधिकारी, प्राचार्य, शिक्षक-शिक्षिका, विद्यार्थी-विद्यार्थिनी, कर्मचारी, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाला उपस्थित राहताना अत्यंत समाधान आणि आनंद झाल्याची भावना आ. सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केली. शिक्षण देणाऱ्या अनेक संस्था असतात; मात्र स्वर्गीय निलकंठराव गुंडावार यांनी स्थापन केलेली लोकमान्य संस्था केवळ पदव्या बहाल करणारी न राहता संस्कार, मूल्ये आणि चारित्र्यनिर्मितीची भक्कम परंपरा जपणारी संस्था ठरली असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.अमृत महोत्सवी वर्ष साजरे करणाऱ्या या संस्थेच्या वाटचालीचे कौतुक करत आ.मुनगंटीवार यांनी संस्थाचालक, शिक्षकवृंद आणि कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले. मूल्याधिष्ठित शिक्षणाच्या ध्येयासाठी समर्पित भावनेने कार्य करणाऱ्या लोकमान्य संस्थेने गेल्या अनेक वर्षांत हजारो विद्यार्थ्यांचे आयुष्य घडवले असून ही गौरवशाली परंपरा पुढेही अखंड सुरू राहावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना आ. सुधीर मुनगंटीवार म्हणाले की, प्रेरणादायी विचार विद्यार्थ्यांच्या जीवनप्रवासाला नवी दिशा देतात. 'लोकमान्य' तोच ठरतो जो अथक परिश्रमातून स्वतःवर विजय मिळवतो. त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याने मेहनत, सातत्य आणि चिकाटीच्या जोरावर यशाचे शिखर गाठावे, असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमात विद्यार्थ्यांना संदेश देताना त्यांनी मोठी स्वप्ने पाहा, खूप शिका आणि आपल्या शहराचा तसेच राज्याचा गौरव वाढवा, असे आ.मुनगंटीवार यांनी सांगितले. तुमच्या कर्तृत्वातून इतरांच्या जीवनात गोडवा निर्माण होणारे कार्य घडावे, हीच खरी समाजसेवा असल्याचे त्यांनी नमूद केले. लोकमान्य संस्थेची स्थापना करताना स्व. निलकंठराव गुंडावार यांचा उद्देश केवळ शिक्षण देण्यापुरता मर्यादित नव्हता, तर प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये संस्कार रुजावेत, हा होता, याची आठवण त्यांनी करून दिली. अमृत महोत्सवी वर्ष म्हणजे केवळ यशाचा उत्सव नव्हे, तर ज्ञानासोबत संस्कारांची सांगड घालणारी परंपरा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. केवळ ज्ञान नव्हे तर गुण आणि मूल्येही तितकीच महत्त्वाची असल्याचे आ.मुनगंटीवार यांनी यावेळी अधोरेखित केले.

काँग्रेसमधील मोठी धुसफूस चव्हाट्यावर, अखेर काँग्रेस प्रदेशाध्यक्ष मध्यस्थी करणार

दिव्य वतन /जिल्हा प्रतिनिधी

चंद्रपूर : चंद्रपुरात काँग्रेसमध्ये मोठी धुसफूस बघायला मिळत आहे. काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार आणि चंद्रपूरच्या खासदार प्रतिभा धानोरकर यांच्यातील अंतर्गत वाद शिगेला पोहोचला आहे. चंद्रपूर मनपातील गट नेता निवडीवरून दोन्ही काँग्रेस नेत्यांमध्ये जोरदार वाद सुरु आहे. अखेर चंद्रपूरमधील पक्षांतर्गत संघर्ष शमविण्यासाठी उद्या काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ नागपुरात पोहोचणार आहेत. हर्षवर्धन सपकाळ दोन्ही नेत्यांची बैठक घेणार आहेत. ते मध्यस्थी करण्याचा प्रयत्न करणार आहेत. AICC चे प्रभारी आणि विदर्भातील मनपा निवडणूक प्रमुख कुणाल चौधरी देखील या बैठकीला उपस्थित राहणार आहेत. चंद्रपूर मनपा मधील काँग्रेस नागरसेवकांपैकी काही नगरसेवक वडेट्टीवार यांनी पळवल्याचा आरोप धानोरकर यांनी केला आहे.

"चंद्रपूरमध्ये काँग्रेस जवळपास बहुमताच्या जवळ आहे. आम्ही सत्तेच्या अगदी जवळ पोहोचलो. निवडणुकीच्या निकालाच्या दिवशी आम्ही सर्वजण आपापल्या घरी असताना आमच्याच काँग्रेसच्या एका मोठ्या नेत्याने आमचे काही नगरसेवक हे घरी असताना त्यांना उचलून नेले. खरंतर जे पक्षाचे नगरसेवक आहेत त्यांना उचलून नेवून असे वेगवेगळे गट करायची गरज नव्हती. ही चुकीची पद्धत झाली. काँग्रेसचे विभाजन दोन गटात झाले. विजय वडेट्टीवार यांचे काही लोकं नगरसेवकांच्या घरी गेले. ते रॅलीत असताना त्या रॅलीतूनच त्यांना उचलून घेऊन गेले", असा आरोप प्रतिभा धानोरकर यांनी केला आहे.

"सोयीसाठी न्यायचे होते तर सर्वांनाच घेऊन जायला हवं होतं. तुम्ही दिलेल्या एबी फॉर्मवर नगरसेवक निवडून आले. अर्धे तुमचे आणि अर्धे आमचे असा विषय आला नाही. खरंतर हा मतदारसंघ माझा आहे. मी इथे काँग्रेसची खासदार म्हणून काम करत आहे. असं असताना कुणीही बाहेरचा माणूस येईल आणि अशाप्रकारचं काम करेल हे पक्षासाठी चुकीचं आहे", अशी नाराजी धानोरकर यांनी व्यक्त केली.

"विजय वडेट्टीवार हे काँग्रेसचे आहेत. मी देखील काँग्रेसची आहे. ते संपूर्ण राज्याचे नेते आहेत. ते माझ्या लोकसभा मतदारसंघापुरता मर्यादीत नाहीत. त्यामुळे त्यांना विनंती आहे की, आख्ख्या महाराष्ट्राकडे लक्ष दिलं पाहिजे. फक्त माझ्या मतदारसंघापुरता किंवा कोणत्या जिल्ह्यापुरता मर्यादीत राहू नये.

मी स्पष्ट बोलणारी व्यक्ती आहे. मी कधी कुणाच्या मतदारसंघात ढवळाढवळ करत नाही. त्यांच्याही मतदारसंघात मी कधी साधा पाय ठेवत नाही. माझा मतदारसंघ आहे. मी सर्वांना एबी फॉर्म दिले, जवळपास महिनाभर मेहनत घेतली आणि सर्वांना निवडून आणलं. यानंतर वेळेवर येऊन कुणी असं कृत्य करत असेल तर ते पक्षासाठी देखील हानिकारक आहे", असं प्रतिभा धानोरकर म्हणाल्या.

"2019 पासून माझ्या मतदारसंघात ढवळाढवळ होत आहे. माझ्या पतीच्या निवडणुकीवेळी देखील ढवळाढवळ झाली. त्यानंतर लोकसभा निवडणुकीला मी निवडणूक लढवली. लोकसभेच्या तिकीटावेळी देखील हाच प्रकार झाला. आतादेखील तेच होत आहे. मी कुणाच्या मतदारसंघात ढवळाढवळ करत नाही.

पक्ष वाढवण्यासाठी मी काम करत आहे. चंद्रपूरचे 2012 मध्ये 12 नगरसेवक होते. आता मी 30 नगरसेवक निवडून आणले. अशावेळी वेळेवर येऊन हे माझे आणि ते माझे करणे योग्य नाही", अशी टीका प्रतिभा धानोरकर यांनी केली.

दिव्य नारी सोशल फाउंडेशन तर्फे मकर संक्रांती निमित्त महिला मेळावा

दिव्य वतन /तालुका प्रतिनिधी

मौदा - रामटेक तहसील चोखाळा येथे दिव्य नारी सोशल फाउंडेशन तर्फे हनुमान मंदिर पटांगणात भव्यदिव्य मकर संक्रांति निमित्त हळदी कुंकू कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमाचे आयोजक दिव्य नारी सोशल फौंडेशन अध्यक्षा कामिनी हटवार यांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले त्यांच्या विचारसरणीतून विधवा महिलांचे सत्कार, छोट्या मुलांचे लुट, महिलांची वेशभूषा, बॉल गेम, बलून गेम, उखाणे स्पर्धा, निशाणा गेम, तळ्यात मळ्यात , रस्सी गेम असे विविध खेळ महिलांचा उत्साह वाढवण्याकरिता खेळण्यात आले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष व प्रमुख पाहुणे शोभाताई झाडे, योगिता कंगाली, राधाताई अग्रवाल, कुंदाताई साठवणे, सुजाता मनेकीरी, रश्मीताई काटेकर , सुरेखा माकडे, नलिनीताई चौधरी, दीक्षिता शेंद्रे, अर्चनाताई तांबुलकर, सपना बावनकुळे, यांच्या हस्ते गणेशाला वंदन करून क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आणि राजमाता जिजाऊ, अहिल्याबाई होळकर यांच्या प्रतिमेचे दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली यावेळी "सत्कारमूर्ती" देशासाठी आपले प्राण अर्पण केले असे अविनाशजी साठवणे पोलीस निरीक्षक यांच्या पत्नी कुंदाताई साठवणे यांचे सत्कार करण्यात आले सोबत , यमुना हटवार, कविता हटवार, निलावती वैरागडे, उषाताई कीरपान, रत्नमाला किरपान, कुंताबाई हटवार, इंद्रावती हटवार, वैशाली कारेमोरे रेखा गणवीर, एकादशी पिशे, सोनबत्ती शाहु, रेणुका हटवार, यशोदा आष्टांकर, इंद्रावती बोबरडे , सुमन मेश्राम, मालाताई निमकर, जमुना हटवार, मिराबाई हटवार, वंदना पिसे, इंद्रावती हटवार, शांताबाई हटवार, जयवंती हटवार, सरुबाई हटवार त्यांचे सत्कार करण्यात आले. त्यानंतर छोट्या बाळांची बोरहन करून छोट्या मुलांचा आनंद लुटण्यात आले. स्वागत गीत निधी हटवार ,आदीती हटवार,साक्षी पीसे,नृत्य आस्था हटवार गौरी पीसे तर महिलांचा उत्साह वाढवण्याकरिता होम मिनिस्टर गेम घेण्यात आले त्यामध्ये पायल वैरागडे यांनी होम मिनिस्टर मान पटकावला तर सुमन मेश्राम उखाणे स्पर्धा दिपाली हटवार, बॉल गेम संगीता हटवार, मुन्नी हटवार, रस्सी गेम योगिता पीसे , संगीता हटवार,निशाणा गेम, वैशाली कारेमोरे बलून गेम शोभा हटवार तळ्यात मळ्यात या महिला विजेत्या ठरल्या. यांना दिव्य नारी फाउंडेशन तर्फे बक्षीस वितरण करण्यात आले. सोबत गावातील सर्व समाजातील सर्वच महिलांना हल्दी कुंकू लावून महिलांना तिळगुळ देऊन वाण वाटप करण्यात आले. यावेळी दिव्य नारी सोशल फाउंडेशन अध्यक्ष कामिनी हटवार आणि सोबत सचिव स्वाती वैरागडे, वैशाली निमकर, यमुना हटवार, अर्चना हटवार,माधुरी निमकर, सीताबाई शाहू, शालू निमकर, लता पानतावणे,स्वाती वैरागडे यांनी संचालन केले तर आभार प्रदर्शन वैशाली निमकर यांनी केले यावेळी गावातील सर्व महिला, बालगोपाल उपस्थित होते.

मोठ्या उमरीत जुन्या वादात दोन गटांत हाणामारी

चौघांविरुद्ध गुन्हा; पोलिसांनी दोघांना घेतले ताब्यात

दिव्य वतन /जिल्हा प्रतिनिधी

अकोला- येथील सिव्हिल लाईन पोलिस स्टेशनच्या हद्दीतील मोठी उमरी परिसरात जुन्या वैमनस्यातून दोन गटांमध्ये हाणामारी झाल्याची घटना सोमवारी दुपारी रौनक मंगल कार्यालयाजवळ घडली. या घटनेमुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. या हाणामारीत दोघे जखमी झाले असून त्यांना उपचारासाठी तातडीने रुग्णालयात दाखल केले आहे.मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित दोन गटांमध्ये यापूर्वीही किरकोळ वाद झाले होते. त्याच जुन्या वादाचे रूपांतर सोमवारी दुपारी अचानक हाणामारीत झाले. दोन्ही गटांतील युवकांनी एकमेकांवर मारहाण केल्याने परिसरातील नागरिकांनी मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला. घटनेची माहिती मिळताच सिव्हिल लाईन आणि स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणली.या प्रकरणी स्थानिक गुन्हे शाखेचे निरीक्षक शंकर शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली एलसीबी पथकाने रोशन रामदास होपड (२१), रा. कारला, ता. तेल्हारा, हल्ली मुक्काम लहान उमरी, अकोला व अंकुश अनिल पिंपळकर (२३), व्यवसाय मजुरी, रा. लहान उमरी, अकोला या दोघांना ताब्यात घेतले आहे. चौघांविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला असून, उर्वरित आरोपींचा शोध सुरू असल्याची माहिती दिली.

या घटनेचा तपास सिव्हील लाईन पोलिस ठाण्याच्या निरीक्षक मालती कायटे यांच्या नेतृत्वाखाली पीएसआय दिनकर पवार, शक्ती कांबळे, प्रदीप पवार, पवन शिरसाट, एकनाथ शिंदे व अक्षय तायडे यांचे पथक तपास करत आहे.

संदेश दावोसचा

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सध्या दावोसला गेलेत. तेथे ते जागतिक आर्थिक मंचाच्या बैठकीस हजर राहणार. मुख्यमंत्री फडणवीस यांनी १६ लाख कोटींचे करार करण्याचे उद्दिष्ट ठेवले. सरकारने फडणवीस यांच्या नेतृत्वाचा उपयोग देशात गुंतवणूक आणण्यासाठी करण्याचा प्रयत्न केला आहे.

गेल्या वर्षी मुख्यमंत्री दावोसला उपस्थित राहिले होते तेव्हा आदित्य ठाकरे यांनी मुख्यमंत्र्यांवर टीका केली होती, की ही गुंतवणूक देशी कंपन्यांचीच आहे. केवळ ११ कंपन्या परदेशी आहेत. पण या राजकीय आरोप-प्रत्यारोपांना बाजूला ठेवले तरीही एक बाब लक्षात येते ती ही, की मुख्यमंत्री फडणवीस यांनी प्रचंड गुंतवणूक आणली आहे आणि त्याचा उपयोग भारतातील बेरोजगारी दूर हटवण्यासाठी करण्यात येईल. गेल्या वर्षी १६ लाख कोटी रुपयांचे एमओयू करण्यात आले होते. त्यापैकी प्रत्यक्षात ७२ टक्के अमलात आले आहेत. यंदाही मोठ्या प्रमाणात महाराष्ट्रात गुंतवणूक आणण्यावर भर राहणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले. यंदा अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हेही जागतिक आर्थिक मंचाचे आकर्षण असणार आहेत. कारण त्यांच्यासमवेत शिष्टमंडळ हे सर्वात मोठे असेल असे सांगण्यात येते. पण ट्रम्प यांनी अनेक देशांना टॅरिफ लावून जेरीस आणले आहे आणि त्यामुळे त्यांच्या वाटाघाटीत काय होते हे महत्त्वाचे आहे. पण विषय आपला महाराष्ट्राचा चालला आहे, तर फडणवीस सांगतात की यंदा गतवर्षापेक्षाही जास्त गुंतवणूक आणणार आहे ते विशेष महत्त्वाचे आहे. मुळात दावोस गुंतवणूक ही जागतिक अर्थव्यवस्थेवर मोठा परिणाम करते. जिथे देश आणि राज्ये, जसे की महाराष्ट्र किंवा मध्य प्रदेश राज्यातून जागतिक कंपन्यांना आकर्षित करण्यासाठी प्रचंड प्रयत्न होतात. त्यामुळे रोजगार निर्मिती, तंत्रज्ञान हस्तांतरण आणि शाश्वत विकासाला चालना मिळते. भू-राजकीय तणाव आणि आर्थिक अनिश्चिततेच्या पार्श्वभूमीवर भारत हे एक प्रमुख गुंतवणूक ठिकाण म्हणून उदयास येत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी नेहमी सांगतात, की भारत हे गुतवणूकदारांचे अत्यंत आकर्षक आणि विश्वासाचे ठिकाण म्हणून सध्या उदयाला आले आहे. त्याचाच परिणाम म्हणजे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा हा दावोस दौरा आहे.

कॅनडा आणि मेक्सिकोपाठोपाठ अमेरिकेने भारतावरही टॅरिफ लावण्याचा आणि तोही भरमसाट टॅरिफ लावण्याचा निर्णय ट्रम्प यांनी घेतल्याच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री फडणवीस यांच्या दौऱ्याला विशेष महत्त्व आहे. कारण मुख्यमंत्री फडणवीस यांनी दावोस येथून जी गुंतवणूक आणतील त्यातून येथे रोजगार निर्माण होतील आणि त्याचा परिणाम येथील तरुणांना रोजगारांचा लाभ देण्यात होईल. त्याचबरोबर महाराष्ट्र हे प्रगत राज्य आहे आणि त्याचे पडसाद राज्याच्या औद्योगिक वाटचालीत दिसून येतात. मुख्यमंत्र्यांचा दावोस दौरा हे त्याचेच फल आहे. मुख्यमंत्र्यांच्या या दावोस दौऱ्याने स्टील म्हणजे पोलाद, केमिकल्स आणि सिमेंट बॅटरी या उद्योगात मोठी गुंतवणूक होईल. मुख्यमंत्री फडणवीस यांच्याच काळात महाराष्ट्र पाचव्या क्रमांकावरून पहिल्या क्रमांकावर आला आणि त्याचे एकमेव कारण होते ते औद्योगिक गुंतवणूक. राज्याची अर्थव्यवस्था एक लाख कोटी डॉलर्सवर नेण्यासाठी राज्यात प्रचंड गुंतवणूक येण्याची गरज आहे आणि ती मुख्यमंत्री फडणवीसच आणू शकतात, असा विश्वास सर्वांनाच आहे. गेल्या काही वर्षांत भारतातील काही औद्यागिक राज्यांच्या सरकारांनी उदा. महाराष्ट्र, आसाम यांनी उच्चाधिकार शिष्टमंडळे दावोसला पाठवली आहेत. त्यात संबंधित राज्यांचे मुख्यमंत्रीही आहेत आणि हाच पॅटर्न यंदाही अमलात आणला आहे. ज्या क्षेत्रात गुंतवणूक केली जाणार आहे, ती क्षेत्रे आहेत स्वच्छ ऊर्जा, सागरी अन्नाची निर्यात आणि तत्सम क्षेत्रे. स्विस कंपन्यांना आपल्याकडे आकर्षित करून घेण्यात मुख्यमंत्री यशस्वी होतील यात काही शंका नाही.महाराष्ट्राची स्पर्धा ही आसाम आणि मध्य प्रदेश या अन्य राज्यांशी असली तरीही त्यात विखार नाही. केवळ आपल्या राज्यासाठी जास्तीत जास्त गुंतवणूक आणणे आणि आपल्या लोकांना चांगल्यातील चांगले जीवन बहाल करणे हेच उद्दिष्ट आहे. कारण शेवटी राज्यकर्त्यांचे उद्दिष्ट तर आपल्या जनतेचे कल्याण करणे हेच असते. यंदा दावोस येथील भारताचे प्रतिनिधित्व भारतातील महाराष्ट्राचे फडणवीस तसेच आणि तेलंगणाचे रेवंथ रेड्डीशिवाय आसामचे विस्वकर्मा आणि झारखंडचे हेमंत सोरेन करतील. प्रत्येक राज्य त्याच्या गरजेच्या दृष्टीने औद्योगिक गुंतवणूक आणण्याचा प्रयत्न करणार आहे. पण सर्वात महत्त्व आहे ते केवळ महाराष्ट्रालाच. कारण हे राज्य प्रगत आहे आणि गेल्या वर्षी त्याने विक्रमी गुंतवणूक आणली आहे. आणखी एक विशेष, की ट्रम्प यांच्या कारकिर्दीला एक वर्ष पूर्ण होत आहे. अशावेळी ते जागतिक आर्थिक मंचाच्या बैठकीत सहभागी होत आहेत, हे निश्चित आहे, की ट्रम्प यांनी टॅरिफचा वापर शस्त्र म्हणून अनेक देशांविरुद्ध केला आहे आणि त्यात भारतही आला. केवळ देशांतर्गत उत्पादकांना संरक्षण देण्यासाठी त्यांनी हे प्रचंड टॅरिफचे शस्त्र उगारले. यात त्यांचा राजकीय उद्देष्यही आहे. जास्तीत जास्त रोजगार अमेरिकन लोकांनाच मिळावा हा त्यांचा उद्देश स्पष्ट आहे. वाढती जागतिक गुंतागुंत आणि भू-राजकीय तुकडे करणाच्या पार्श्वभूमीवर आर्थिक स्पर्धात्मकता यांच्या परिप्रेक्ष्यात जागतिक आर्थिक मंच जागतिक नेत्यांना भारतातील राजकीय नेत्यांना इमपार्शल म्हणजे तटस्थ मंच उपलब्ध करून देईल अशी आशा वाटते. मुख्यमंत्री फडणवीस यांची आणखी एक परीक्षा आहे आणि त्यात ते कितपत यशस्वी होतात हे काळच दाखवेल. पण त्यांचे कर्तृत्व पाहता ते यातही यशस्वी होतील यात काही शंका नाही. ट्रम्प यांच्या एकांगीवादाला फडणवीस यांचे यश हेच उत्तर आहे. जागतिक आर्थिक मंचाची बैठक ही जग कोणत्या दिशेने जात आहे याविषयी अधिक आहे. सामान्य गुंतवणुकीसाठी जागतिक आर्थिक मंचाच्या बैठकीतील निर्णय हे परिणामकारक नसतात पण ते खरे असतात आणि त्यातून जे धोरणात्मक संदेश दिले जातात त्यांच्यासाठी ते वास्तविक असतात.

भाजप दक्षिण महाराष्ट्रात काठावर पास!

भाजपला दक्षिण महाराष्ट्रात अपेक्षित यश मिळाले नाही, पण ते टिकून राहिले. यामागे मराठा आरक्षणाचा मुद्दा, स्थानिक गटबाजी आणि महाविकास आघाडीची मजबूत पकड ही प्रमुख कारणे असू शकतात, ज्यामुळे भाजपला मोठी आघाडी घेता आली नाही, अशी राजकीय विश्लेषकांची भूमिका आहे.

सांगली-मिरज-कुपवाड, कोल्हापूर आणि इचलकरंजी या महानगरपालिकांच्या निकालांनी दक्षिण महाराष्ट्राच्या राजकीय क्षितिजावर भारतीय जनता पक्ष (भाजप) आणि महायुतीने मिळवलेले यश कौतुकास्पद आहे. मात्र तरीही ते काठावरचे आहे. सांगली, कोल्हापूर जिल्ह्यात त्यामुळे अधिक कष्ट करावे लागतील. राज्यभरातील २९ महानगरपालिकांपैकी अनेक ठिकाणी महायुतीची सत्ता प्रस्थापित झाली असताना, दक्षिण महाराष्ट्रातील हे निकाल विशेष महत्त्वाचे ठरतात. सांगली-मिरज-कुपवाड महानगरपालिकेत भाजपने सर्वाधिक जागा जिंकून आपली मजबूत उपस्थिती दाखवली. ही पारंपरिकपणे काँग्रेस-प्रभावित असलेली जागा आता विकासाच्या मुद्द्यांवर भाजपच्या बाजूने झुकली आहे. पण भाजपला ३९ आणि उर्वरित पक्षांना ३९ जागा मिळाल्याने शिंदे शिवसेना आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादीला विनंती करण्याची वेळ पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्यावर आली आहे.ज्या तडजोडी होतील त्यानुसारच सांगलीचा निर्णय घेतील अशी सध्याची स्थिती आहे. त्यामुळे पुढचे किमान चार दिवस इथली राजकीय परिस्थिती दोलायमान असणार आहे. अर्थात सगळे विरोधक मिळून आकडा ३९ होत असल्याने त्यांना वाढीला मर्यादा आहेत. भाजप मात्र शिवसेनेच्या दोन जागा किंवा अजित पवार राष्ट्रवादीच्या १६ जागा असल्याने त्यांच्याशी हात मिळवणी करून ४० पेक्षाही भरभक्कम बहुमत मिळू शकते. मात्र त्यासाठी हे मित्रपक्ष कोणत्या अटीवर तयार होतील ते सांगता येणे अवघड आहे. अर्थात या ठिकाणी शरद पवार राष्ट्रवादीचे तीन सदस्य फोडून आपल्याकडे वळवण्यात सुद्धा भाजप लक्ष घालू शकते. काँग्रेस सोडून इतर सर्वांशी युती अशी त्यांची भूमिका आहे. त्यालाही इतर पक्ष काय साथ देतात यावर या रणनीतीचे भविष्य अवलंबून असेल. कोल्हापूर महानगरपालिकेत मात्र काँग्रेस सर्वाधिक जागा मिळवूनही महायुतीने (भाजप-शिवसेना शिंदे गट) सत्ता आपल्या हाती घेतली. कोल्हापूर ही ऐतिहासिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या संवेदनशील जागा असून, तेथे भाजपने आपला प्रभाव वाढवणे हे मोठे यश आहे. महायुतीच्या एकत्रित प्रयत्नांमुळे विरोधकांच्या मतांची फाटाफूट झाली आणि विकासाच्या मुद्द्यांवर एकसंध मतदान झाले. शहरातील आरोग्य, शिक्षण, पर्यटन विकास आणि महिला सशक्तीकरण यांसारख्या योजनांनी मतदारांना आकर्षित केले. कोल्हापूरमध्ये काँग्रेसचे पारंपरिक बालेकिल्ले ढासळत असताना, भाजपच्या रणनीती आणि स्थानिक नेत्यांच्या मेहनतीचे हे फलित आहे. इचलकरंजी महानगरपालिकेत भाजपने स्पष्ट बहुमत मिळवले. वस्त्रोद्योगाचे हे प्रमुख केंद्र असलेल्या शहरात उद्योगांना प्रोत्साहन, रोजगार निर्मिती आणि पायाभूत सुविधा विकास यांसारख्या मुद्द्यांवर पक्षाने भर दिला. नव्याने स्थापन झालेल्या या महानगरपालिकेत पहिल्याच निवडणुकीत भाजपने एकहाती सत्ता मिळवणे हे त्यांच्या संघटनात्मक सामर्थ्याचे आणि जनतेशी थेट संवादाचे उदाहरण आहे. या तिन्ही निकालांतून एक स्पष्ट संदेश बाहेर येतो–दक्षिण महाराष्ट्रातील जनता आता जातीय, प्रादेशिक किंवा पारंपरिक राजकारणापासून दूर जाऊन विकास, सुशासन आणि स्थिर सरकारला प्राधान्य देते. भाजपने केंद्र आणि राज्य सरकारच्या योजनांचा स्थानिक पातळीवर प्रभावी प्रचार केला. 'सबका साथ, सबका विकास' हा मंत्र येथे प्रत्यक्षात उतरला. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील धोरणे–मुद्रा योजना, लाडकी बहीण योजना यांचा थेट फायदा दक्षिण महाराष्ट्रातील शेतकरी, महिला, उद्योजक आणि युवकांना झाला. त्याचे प्रतिबिंब शहरातील मतदानावरही उमटले हे विशेष. हे यश सहज आलेले नाही. स्थानिक नेते, कार्यकर्ते आणि महिला-युवा मोर्चांने घराघरात जाऊन प्रचार केला. सोशल मीडिया, डिजिटल माध्यमे आणि ग्राउंड लेव्हलची मेहनत यामुळे विरोधकांच्या राजकारणाला जनतेने ठाम नकार दिला. अर्थात काँग्रेसने या भागात उचललेले मुद्दे भाजपला आजही आव्हान देणारे आहेत. त्यांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करणे भविष्यात महागात पडू शकते. जनतेने विकासाच्या बाजूने मतदान करून एक नवा आदर्श निर्माण केला असे सरकारी पक्ष म्हणत असला तरी वास्तव काय आहे याची त्यांना पुरती जाणीव आहे, असे नाही. त्यासाठी प्रत्यक्ष काम करून दाखवावे लागेल. सत्ता पक्षात असलेल्या भाजपला ही जबाबदारी अधिक क्षमतेने पेलावी लागणार आहे. आता प्रश्न असा आहे की, हे यश कायम ठेवण्यासाठी महायुती काय करणार? सांगली, कोल्हापूर आणि इचलकरंजीमध्ये पाणीटंचाई, रस्ते, स्वच्छता, रोजगार आणि पर्यटन विकास अशी अनेक आव्हाने आहेत. या निकालांनी दिलेल्या जबाबदारीची पूर्तता करणे हे आता महायुतीसमोरचे खरे आव्हान आहे. जर ही तिन्ही शहरे सुशासनाचे आदर्श ठरले, तर दक्षिण महाराष्ट्रात भाजपचा प्रभाव आणखी मजबूत होईल आणि आगामी सर्व निवडणुकांसाठी शुभसंकेत मिळतील. मात्र कंत्राटदारधार्जिणे नेते आणि कार्यकर्ते पूर्वीच्या पद्धतीनेच कारभार करत राहिले तर मात्र त्यांना मोठा फटका बसू शकतो. बदलत्या पिढीतील मतदार अचानक खूप विश्वास टाकून मतदान करतो तसाच तो सत्तेपासून वंचित ठेवण्यास ही यशस्वी ठरू शकतो. त्यामुळे दक्षिण महाराष्ट्रात मिळालेले हे इशारा देणारे आहे. चांगले काम करून दाखवावे लागेल अन्यथा बदल अटळ आहे.

स्वत:ची जबाबदारीही घेत नाहीत



बेजबाबदार माणसं
लाईट-पंखे तसेच चालू ठेवून
बाहेर पडतात
हात धुऊन झाला तरी
बेसिनचा नळ सुरूच ठेवतात
बेजबाबदार माणसं
कागद चुरगळून कुठंही फेकतात
बेजबाबदार माणसं
बेजबाबदारपणे
चालतात-बोलतात-वागतात
केळी खाल्ली तरी
सालपटं रस्त्यावरच टाकतात
बेजबाबदार माणसं
वेळा पाळत नाही
ती केव्हाही येतात
केव्हाही जातात
ती वायदा पाळत नाहीत
लाईट बील – फोन बील
ती वेळेवर भरत नाहीत
शब्द पाळत नाहीत
अशी माणसं
कर्जाचे हप्ते वेळेवर फेडत नाहीत
बेजबाबदार माणसांच्या
गाड्या चुकतात, संधी हुकतात
बेजबाबदार माणसं
देशाची-समाजाची-घराची
एवढंच काय,
स्वत:चीही जबाबदारी घ्यायला
तयार नसतात.

'बेजबाबदार माणसं' ही कविता नाशिकचे कवी उत्तम कोळगावर यांची आहे. ती सकाळ शब्ददीप दिवाळी 2022 मध्ये प्रकाशित झाली आहे. या कवितेत कवीने बेजबाबदार माणसाची काही लक्षणे सांगितली आहेत. कविता वाचताना ती सहजपणे लक्षात येतात. याचा अर्थ ही कविता आकलन सुलभ आहे, तिच्यात कवीने अनेक विधाने केलेली आहेत. त्या विधानांतून कवीने बेजबाबदार माणसांचा आळस, त्यांचा हलगर्जीपणा आणि त्यांच्या वर्तनातील बेमुर्वतखोरपणा लगेच जाणवतो. काम झाल्यावर लाईट-पंखे तसेच चालू ठेवून बाहेर पडणे, हात धुतल्यानंतर बेसिनचा नळ तसाच सुरू ठेवणे, बिनकामाचा कागद चुरगळून कचरा कुंडीत न टाकता स्वैरपणे भिरकावून देणे इत्यादी सहज आढळणाऱ्या कृतींतून बेजबाबदार माणसांचा शिस्तहिन, उच्छृंखल आणि बेदरकार स्वभाव लक्ष वेधून घेतो.

अशा बेजबाबदार माणसांचे बोलणे-चालणे, जगणे-वागणे हे इतरांशी संबंधित असले तर ते त्यांना त्रासदायकच नव्हे तर वेदनादायी ठरू शकते. 'केळी खाल्ली तरी सालपटं रस्त्यावरच टाकतात' हे त्यांचे वर्तन केवळ वैयक्तिक पातळीवर राहत नाही. त्यासाठी या कवितेत कवीने एक प्रसंग सांगितला आहे. तो आवर्जून ध्यानात घेण्यसारखा आहे. कवी म्हणतो-

"परवा एक चांगला धडधाकट माणूस
केळाच्य सालीवरून घसरून पडला
त्याचा पायच मोडला
आता तो चार महिन्यांसाठी
जायबंदी झाला आहे."

कवी उत्तम कोळगावकर यांनी बेजबाबदार माणसांची तथाकथित गुणवैशिष्ट्ये सांगताना पुढे म्हटले आहे की, ती वेळा पाळत नाही, करार-वायदा यांची पर्वा करीत नाही, त्याच्या येण्या-जाण्याला मर्यादा किंवा धरबंद नसतो, त्यांची लाईट बिलं-फोनबिलं वेळेवर भरली जात नाहीत, कर्जाचे हप्ते मुदतीच्या आत भरणे हे त्यांच्या गावी नसते. अर्थातच अशी माणसं शब्दांना जागत नाही. त्यामुळे स्वाभाविकच आपल्या अनिर्बंध वागण्याचा इतरांच्या मनावर काय परिणाम होईल हे त्यांच्या हिशोबात नसते. स्वाभाविकच अशा माणसांच्या गाड्या चुकतात, त्यांच्या संधी हुकतात आणि त्यामुळे त्यांच्या जगण्याला दिशा आणि जीवनाला स्थैर्य प्राप्त होत नाही. परिणामी ती प्रवाहपतित आणि गतानुगतिक बनतात. अशी माणसं आपली प्राप्तकर्तव्ये नीट पार पाडू शकत नाही. म्हणून आयुष्यभर त्यांना पुढे पश्चातापच करावा लागतो. कवितेच्या शेवटी कवी म्हणतो की, "बेजबाबदार माणसं देशाची-समाजाची-घराची एवढंच काय, स्वत:चीही जबाबदारी घ्यायला तयार नसतात."

उत्तम कोळगावकरांची 'बेजबाबदार माणसं' ही कविता वाचताना वरवर ती फारच साधी, सोपी आणि गद्यात्मक वाटते. पण तिच्यातील बेजबाबदार माणसांच्या वर्तनातील तपशीलाला एक विशिष्ट क्रम आणि संगती असल्याचे जाणवते. स्वत:चीही जबाबदारी घ्यायला तयार नसलेली ही बेजबाबदार माणसं जेवताना ताटात उष्टे टाकून अन्नाचा एक प्रकारे अपमान करतात. ते शक्यतोवर कोठेही उशिरा जाऊन कार्यक्रमात व्यत्यय आणतात. वाहने चालवताना मोबाईलवर बोलतात. काही तर गतिधुंद होऊन इतरांना आणि पुढे असणाऱ्या वाहनांना धडक देतात. आतताईपणाचा आणि निष्ठुरतेचा कहर म्हणून बायकापोरांना व्यसनाधीन होऊन मार देतात. शिक्षक विद्यार्थ्यांना अनाठायी आणि अवाजवी शिक्षा करतात. बेजबाबदार माणसांचे इतरांशी एकूणच वागणे-बोलणे, व्यवहार करणे म्हणजे असभ्यतेचा कळस असतो. त्यामुळे त्यांच्या घरात दु:ख, अशांतता, अस्वस्थता आणि सतत ताणतणाव असतात. म्हणून त्या घरामध्ये सुख समाधान असत नाही. बेजबाबदार माणसांना आर्थिक स्थैर्य, सामाजिक प्रतिष्ठा आणि मानमरातब मिळत नाही. स्वत:ची, घराची पर्वा न करणारे हे बेजबाबदार लोक सामाजिक स्वास्थ्याचा विचार करीत नाहीत. जात, धर्म, देव, दैवते आणि धार्मिक परंपरा यांच्या नावाखाली ह्या बेजबाबदार लोकांची सतत अरेरावी सुरू असते. ह्या लोकांच्या हातात राजकीय सत्ता आली तर ते त्या संस्थांची, राज्यांची आणि देशाची वाट लागतात. त्यामुळे शिक्षण, आरोग्य, कायदा आणि सुव्यवस्था, वाहतूक, धार्मिक रूढी-परंपरा आणि सांस्कृतिक कार्यक्रमांत अनागोंदी आणि अंदाधुंदी निर्माण होते. बंद, आंदोलने, निदर्शने, त्यातून होणारी वाहतूक कोंडी आणि जाळपोळ यांमुळे दैनंदिन जीवन वेठीस धरले जाते. बेजबाबदार माणसांच्या हाती घराची, समाजाची, राज्याची आणि देशाची सत्ता सोपविली गेली तर सार्वजनिक जीवनाचा खेळखंडोबा आणि बट्ट्याबोळ अटळ असतो.

खरं म्हणजे आपल्या जबाबदारीची जाणीव असणे आणि ती व्यवस्थित पार पाडणे, हे सभ्य आणि सुसंस्कृत माणसाचे आद्यकर्तव्य आहे. त्याचे ते एक सकारात्मक आणि विधायक जीवनमूल्य आहे. ज्याने-त्याने म्हणजे प्रत्येकाने आपली संबंधित, स्वीकृत जबाबदारी जर व्यवस्थित पार पाडली तर कुटुंबात सलोखा, समाजात भावनिक ऐक्य, आपल्या प्रदेशत राजकीय स्थैर्य आणि देशात विकासाचे पर्व अस्तित्वात येऊ शकते. हीच माणुसकीची खूण आणि हेच मानवतावादाचे द्योतक आहे. अन्यथा ही बेजबाबदार माणसे अणुक्रांतीच्या माध्यमातून जगावर पुन्हा छळछावण्या आणि हिरोशिमा-नागासाकी लादू शकतील, याची सार्थ भीती वाटते. बेजबाबदार माणसांचा हा चढता आलेख मानवजातीच्या विनाशाची नांदी ठरू शकेल, यात शंका नाही. अशाप्रकारे उत्तम कोळगावकरांनी बेजबाबदार माणसांची अनैतिकता आणि दिशाहिनता या कवितेतून यथार्थपणे व्यक्त केली आहे.

डॉ.एस.एम.कानडजे
बुलढाणा

श्रमप्रतिष्ठा : संकल्पनेचे उपयोजन

श्रमप्रतिष्ठा म्हणजे श्रमाचा सन्मान, श्रमिकाचा आदर आणि श्रमसंस्कृतीचा गौरव होय. श्रम, मग कोणत्याही प्रकारचे असो, त्याची एक ओळख असते, वैशिष्ट्य असते आणि उपयोगितामूल्य असते. म्हणून प्रत्येक प्रकारच्या श्रमाला योग्य तो मोबदला, आवश्यक ती प्रतिष्ठा, उचित सन्मान मिळाला पाहिजे. वैयक्तिक आयुष्य, कौटुंबिक प्रपंच आणि सामाजिक व्यवस्था यांचा श्रम हा मूलाधार आहे. 'श्रमप्रतिष्ठे'साठी सर्वप्रथम श्रम करणाऱ्याने आत्मसन्मान जपला पाहिजे. आपल्या श्रमाविषयी न्यूनगंड किंवा अपराधभाव बाळगण्याची गरज नाही. याउलट त्याने 'माझे श्रम महत्त्वाचे आहे. मी ते कुशलतेने आणि प्रामाणिकपणे करीन.' स्वाभाविकच संबंधितांनी त्याचे 'मोल' जाणले पाहिजे, असा आत्मविश्वास बाळगून तसा आग्रह धरला पाहिजे. कर्तव्यबुद्धी, सेवाभाव, प्रारब्ध, आर्थिक अडचण ह्या बाबी तारतम्याने घेऊन श्रमिकाने श्रमाला महत्त्वाचे स्थान दिले तरच त्याच्या श्रमाला प्रतिष्ठा प्राप्त होऊ शकते. 'श्रमप्रतिष्ठा' ही एक संज्ञा आहे, संकल्पना आहे. संकल्पना म्हणजे एखाद्या कृतीमागील किंवा घटनेमागील अमूर्त, मूलभूत कल्पना होय. श्रमप्रतिष्ठेचा पूर्ण मोबदला कोणीही प्रदान करू शकत नाही. श्रमप्रतिष्ठेची जाणीव ही एक मानसिकता आहे, तिचा आविष्कार कृतीतून, वर्तनातून प्रकट होत असतो. याचा सरळ अर्थ श्रमप्रतिष्ठेविषयी आपल्या मनात असलेला आदरभाव हे एक जीवनमूल्य आहे. त्या मूल्याचे प्रत्यंतर वैयक्तिक आचरणात आणि सामाजिक वर्तनात दिसून येणे म्हणजे श्रमप्रतिष्ठेचे उपयोजन करणे होय.

वेळेचे नियोजन, कामातील प्रामाणिकपणा, योग्य उपकरणांचा- तंत्रज्ञानाचा वापर, सकारात्मक दृष्टिकोन आणि कामातील कौशल्य ह्या बाबी श्रमिकांसाठी अत्यंत उपकारक ठरतात. श्रमप्रतिष्ठा आणि तिची अंमलबजावणी योग्य प्रकारे केली तर सामाजिक नैतिकता आणि राष्ट्रीय उत्पन्नात प्रगती झाल्याशिवाय राहत नाही. श्रमप्रतिष्ठा प्रमाण मानून काम करणारा श्रमिक-कर्मचारी शिस्त, सवय, सातत्य, संतुलन, सुदृढता आणि मानसिक आरोग्य ह्या गोष्टींमुळे उन्नत, आनंदी आणि मूल्यात्मक जीवन जगू शकतो. त्याच्या जीवनात प्रेम, सौंदर्य, आनंद आणि सार्थकता यांना अर्थपूर्ण स्थान प्राप्त झाल्याशिवाय राहत नाही. आपल्या समाजाला श्रमणसंस्कृतीचा प्रभावी वारसा आहे. श्रम करणारा म्हणजे श्रमण होय. श्रमणसंस्कृती ही श्रमाचा गौरव, सन्मान करणारी संस्कृती आहे. भगवान गौतम बुद्धांनी मालक-नोकर संबंधांविषयी कामाचे स्वरूप, भोजन, वेतन, शुश्रूषा, विश्रांती इत्यादीबाबत जे सांगितले आहे ते जणू मालक-नोकर संबंध सुस्थिर होण्याचा पायाभूत सिद्धांत आहे. याचा अर्थ इ. स. पूर्व २५०० वर्षांपूर्वी बुद्धांच्या काळात श्रमसंस्कृतीचा उचित, कृतिशील, फलदायी आणि समाजोपयोगी आविष्कार पाहायला मिळतो. संतांनी प्रपंचात राहून परमार्थ करण्याचा प्रयत्न केला. संसार सोडून परमार्थ करावा, असे कोणी सांगितले नाही. कारण ते आपापल्या संसारात वैयक्तिक श्रम करीत होते, त्यांनी कृतीतूनच श्रमाची प्रतिष्ठा जपली होती. विहित कर्म करणे हीच ईश्वरपूजा आहे, कामात 'राम' पाहणे हाच खरा परमार्थ आहे, विहित कर्मापासून दूर न जाणे, श्रमाची नैतिकता आणि पवित्रता राखणे इत्यादीबाबत ज्ञानेश्वरीमध्ये स्पष्ट पुरावे सापडतात. समर्थ रामदासांनी तर आळशी, कामचुकार, करंटे, ऐदी यांच्यावर सडेतोडपणे कोरडे ओढले आहेत. वैयक्तिक प्रयत्नवाद आणि श्रमप्रतिष्ठा याबाबत समर्थांनी केलेला पुरस्कार सर्वज्ञात आहे, यात शंका नाही. महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांचा वैयक्तिक, सामाजिक प्रपंच म्हणजे प्रयत्नवादाचा आविष्कार आहे. अंगमेहनतीच्या कष्टाच्या कामाची त्यांना सवय असल्यामुळे ते शेतकरी वर्गाबद्दल कनवाळू आणि प्रयत्नशील होते. स्वावलंबन, साधेपणा आणि सार्वजनिक स्वच्छतेची कामे करण्याची वृत्ती यांमुळे गांधीजी जनतेचे महात्मा बनले होते. "खेड्याकडे चला" या महात्माजींच्या संदेशाचा वंदनीय राष्ट्रसंतांच्या विचारधारेवर परिणाम झाला आणि तो ग्रामगीतेतून पदोपदी प्रतिबिंबित झाला. 'खेड्याची समृद्धी' संबंधी गांधीजींची आणि राष्ट्रसंतांची वैचारिक जातकुळी एकच होती. खेडयाचा विकास म्हणजे पर्यायाने शेतकऱ्यांचा विकास यासाठीच पूर्ण क्षमतेने गांधीजींनी काम केले व तेच कार्य राष्ट्रसंतांनी 'ग्रामगीता' या ग्रंथात खुलासेवार मांडले. श्रमप्रतिष्ठेचा आदर्श पुरुष म्हणजे लोकसंत गाडगेबाबा होय. खेड्यापाड्यातील अस्वच्छता, अंधश्रद्धा आणि खर्चिक लोकरूढींच्या प्रत्यक्ष अनुभवांतून तावून सुलाखून निघाल्यामुळे, सामान्यजनांना गांजणाऱ्या या तीन्ही प्रकारांबद्दल त्यांना अतोनात चीड होती. समाजाने स्वच्छतेची कास धरावी, यासाठी त्यांनी आयुष्यभर कष्ट उपसून स्वच्छता आणि श्रमप्रतिष्ठा या मूल्यांना मोठेपण व नैतिकता प्राप्त करून दिली. गावातील रस्ते, गल्लीबोळ्या, मोकळ्या जागा, मंदिरांचे परिसर, बाबांच्या खराट्याच्या श्रमशक्तीने स्वच्छ होऊ लागले. त्यामुळे रोगराईचे प्रमाण कमी होऊ लागले. दिवसा गावातील घाण आणि रात्रीच्या कीर्तनातून अज्ञानाची घाण साफ करणे, हा बाबांचा दिनक्रमच झाला होता. खराट्याला त्यांनी शस्त्राचे सामर्थ्य प्राप्त करून दिले.

डॉ. विकास बाहेकर
बुलढाणा

दिव्य वतन हे दैनिक वृत्तपत्र प्रकाशक मालक मुख्य संपादक गोपाल आनंदराव कडुकर यांनी कार्यालय हाऊस नंबर १८ निवास सोसायटी स्वामी समर्थ मंदिर जवळ घोगली रोड बेसा तालुका जिल्हा नागपूर - ४४००३४ येथून प्रकाशित केले. संपर्क मो. ७७०९३७७५१०

नितीन नबीन भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष बनले

मोदींनी पुष्पहार घालून त्यांचे स्वागत केले..

दिव्य वतन /वृत्तसेवा

नवी दिल्ली : भाजपचे १२ वे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून नितीन नबीन यांची बिनविरोध निवड झाली आहे. मंगळवारी भाजप मुख्यालयात ही घोषणा करण्यात आली. पंतप्रधान मोदींनी त्यांचे पुष्पहार अर्पण करून स्वागत केले.

मोदी म्हणाले, "भाजप हा असा पक्ष आहे जिथे लोकांना प्रश्न पडेल की मोदीजी इतक्या लहान वयात मुख्यमंत्री का झाले? ते सरकारचे प्रमुख झाले. सर्वात महत्त्वाचे म्हणजे मी भाजपचा कार्यकर्ता आहे. पण मला वाटते की नितीनजी माझे बॉस आहेत, मी एक कार्यकर्ता आहे."

यापूर्वी, नवीन यांनी दिल्लीतील भगवान वाल्मिकी मंदिर, गुरुद्वारा बांगला साहिब आणि झंडेवालन मंदिराला भेट दिली आणि पूजा केली. ४५ व्या वर्षी, नवीन पक्षाचे सर्वात तरुण राष्ट्रीय अध्यक्ष बनले आहेत. त्यांच्यापूर्वी अमित शहा यांची वयाच्या ४९ व्या वर्षी राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून निवड झाली होती.

सोमवारी भाजप मुख्यालयात अध्यक्षपदासाठी निवडणूक झाली. इतर कोणत्याही उमेदवाराने अर्ज दाखल न केल्याने नबीन यांची बिनविरोध निवड झाली.

१४ डिसेंबर २०२५ रोजी नितीन यांची पक्षाचे कार्यवाहक अध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली.

कॉम्रेड गोविंद पानसरे हत्या प्रकरण:मुख्य आरोपी समीर गायकवाडचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू

दिव्य वतन /वृत्तसेवा

मुंबई-जेष्ठ पुरोगामी विचारवंत कॉम्रेड गोविंद पानसरे यांच्या हत्या प्रकरणातील मुख्य संशयित आरोपी आणि 'सनातन संस्थेचा' साधक समीर गायकवाड याचा आज सकाळी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने मृत्यू झाला. सांगलीतील शासकीय रुग्णालयात उपचारादरम्यान त्याने अखेरचा श्वास घेतला. चार वर्षांपासून तो जामीनावर बाहेर होता. गायकवाडच्या मृत्यूमुळे पानसरे हत्या प्रकरणाचा खटला आणि पुढील तपासासमोर नवे आव्हान उभे ठाकले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, समीर गायकवाड सांगलीतील विकास चौक परिसरात आपल्या कुटुंबासह वास्तव्यास होता. सोमवारी मध्यरात्रीच्या सुमारास त्याला अचानक अस्वस्थ वाटू लागले. प्रकृती वेगाने बिघडल्याने कुटुंबीयांनी

त्याला तातडीने सांगलीच्या शासकीय रुग्णालयात दाखल केले. मात्र, त्याने उपचारांना प्रतिसाद दिला नाही आणि मंगळवारी पहाटे डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. हृदयविकाराने मृत्यू झाल्याचा प्राथमिक अंदाज असला, तरी शवविच्छेदन अहवालानंतरच मृत्यूचे अधिकृत कारण स्पष्ट होईल.ज्येष्ठ विचारवंत आणि सामाजिक कार्यकर्ते कॉम्रेड गोविंद पानसरे यांच्यावर १६ फेब्रुवारी २०१५ रोजी कोल्हापूरमध्ये सकाळी मॉर्निंग वॉकवरून परतत असताना अज्ञात हल्लेखोरांनी गोळीबार केला होता. या हल्ल्यात पानसरे गंभीर जखमी झाले होते, तर त्यांच्या पत्नी उमाताई पानसरे यांनाही दुखापत झाली होती. उपचारादरम्यान २० फेब्रुवारी २०१५ रोजी गोविंद पानसरे यांचे निधन झाले.सुरुवातीला या प्रकरणाचा तपास कोल्हापूर 'एसआयटी'कडे होता. मात्र, पानसरे कुटुंबीयांच्या मागणीनंतर मुंबई उच्च न्यायालयाने २०२२ मध्ये हा तपास 'एटीएस'कडे सोपवला. ९ जानेवारी २०२३ रोजी कोल्हापूर सत्र न्यायालयाने समीर गायकव डॉ. वीरेंद्रसिंह तावडे, ३ ाळे, शरद कळसकर यांच्यासह १० संशयितांवर हत्येचा कट रचणे आणि हत्या करणे याप्रकरणी आरोप निश्चित केले होते. या प्रकरणातील सर्व १२ संशयितांना सध्या न्यायालयाने जामीन मंजूर केलेला आहे.

खटल्याची प्रक्रिया सुरू असतानाच आता मुख्य संशयित समीर गायकवाडचा मृत्यू झाला आहे.गोविंद पानसरे हे 'शिवाजी कोण होता?' या प्रसिद्ध पुस्तकाचे लेखक आणि खंदे पुरोगामी नेते होते. त्यांच्या हत्येचा खटला सध्या न्यायालयात सुरू आहे. तपास यंत्रणांच्या मते, समीर गायकवाड हा या संपूर्ण कटातील अत्यंत महत्त्वाचा दुवा होता. त्याच्या माध्यमातून या हत्येमागील मुख्य सूत्रधार आणि इतर आरोपींपर्यंत पोहोचण्याचे मोठे आव्हान यंत्रणांसमोर होते.

भाजप नेत्यांची वक्तव्य म्हणजे हवेतली पतंगबाजी:वडेट्टीवार यांनी लगावला टोला

दिव्य वतन /जिन्हा प्रतिनिधी

चंद्रपूर महापालिकेत काँग्रेसची सत्ता येणार असून त्यासाठीचे आवश्यक संख्याबळ जमवल्याचे काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी आज स्पष्ट केले. काँग्रेसचे नगरसेवक भाजपच्या संपर्कात ही भाजप नेत्यांची विधान म्हणजे हवेतील पतंगबाजी असल्याचा टोला विजय वडेट्टीवार यांनी लगावला

काँग्रेस पक्षाचा नेता म्हणून चंद्रपुरात काँग्रेसची सत्ता स्थापन करणे आणि तिथला महापौर बसवणे ही आमची प्राथमिकता आहे, त्यासाठी आवश्यक संख्याबळ मिळवल्याचे काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी सांगितले. चंद्रपुरात कुणालाही तोडफोड करणे, नगरसेवक पळवणे यासाठी स्कोप नाही. त्यामुळे कोणी काहीही विधान केली तरी काँग्रेसचाच महापौर होणार असे सांगत वडेट्टीवार यांनी

भाजपच्या दाव्यातील हवा काढली. भाजपचे नगरसेवक काँग्रेसचाही संपर्कात असल्याचे संकेत वडेट्टीवार यांनी यावेळी दिले. चंद्रपुरात जनतेने काँग्रेसला कौल दिला असल्याने तिथे जनतेला अपेक्षित असा काँग्रेसचा महापौर होणार अस वडेट्टीवार म्हणाले.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे सहा नगरसेवक निवडून आले आहेत. राज्यात महाविकास आघाडी आल्याने या नगरसेवकांना चंद्रपुरात सोबत घेण्याबाबत चर्चा सुरू असल्याचे काँग्रेस नेते वडेट्टीवार यांनी सांगितले. महापौर पदावर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने दावा केला, हा त्यांचा अधिकार आहे, सर्वच गोष्टींबाबत शिवसेना पक्षातील पक्षश्रेष्ठींशी चर्चा सुरू असल्याचे वडेट्टीवार म्हणाले. चंद्रपुरात काँग्रेस निष्ठावंत आणि अनुभवी नगरसेवक यांना महापौर बनवावे अशी भूमिका आहे. नागपुरात पत्रकारांशी संवाद साधत असताना काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी चंद्रपूर महापालिकेबाबत भूमिका मांडली.

मुंबई-अहमदाबाद हा राष्ट्रीय मार्ग १९ आणि २० जानेवारी रोजी मुंबईकडे जाणाऱ्या अवजड वाहनांसाठी बंद ठेवण्यात आला असून याची अधिसूचना पालघर जिल्हाधिकारी यांनी गुजराती भाषेत काढली ही सुरुवात आहे. पालघर पासून गुजरातीचा शिरकाव करण्यात येत आहे. भाजपचा मुंबईत महापौर होणार, म्हणजे कुणाच्या इशाऱ्यावर मुंबई चालणार हे स्पष्ट आहे अशी टीका काँग्रेस विधिमंडळ नेते वडेट्टीवार यांनी केली.

नितीन नबीन ममतांचा गड जिंकू शकतील का?:भाजपचे मिशन पूर्ण करणार?

दिव्य वतन /वृत्तसेवा

नवी दिल्ली : नितीन नबीन यांची भाजपच्या १२व्या राष्ट्रीय अध्यक्षपदी निवड झाली आहे. मंगळवारी भाजप मुख्यालयात याची घोषणा करण्यात आली. यावेळी पंतप्रधान मोदींनी त्यांचे पुष्पहार घालून स्वागत केले. ४५ वर्षीय नितीन नबीन ४६ वर्षांच्या भाजपची कमान सांभाळतील.

नितीन नबीन यांच्या नियुक्तीला तज्ज्ञ 'मास्टर स्ट्रोक' म्हणत आहेत, कारण भाजपसमोर सध्या बंगालची निवडणूक जिंकण्याचे लक्ष्य आहे. नितीन नबीन कायस्थ जातीचे आहेत. कायस्थ असल्यामुळे ते बंगालमधील त्या वर्गाशी जोडले जातात, ज्याने दशकांपासून राज्याच्या सत्ता आणि संस्कृतीला आकार दिला आहे.बिहार आणि बंगालमध्ये सांस्कृतिक समानता आहेत. तज्ज्ञांचे मत आहे की, हा निर्णय

अमित शहा यांच्या रणनीतीचा भाग आहे, जे बंगालला 'पुढील मोठे लक्ष्य' मानतात. पंतप्रधान मोदींनीही आज आपल्या भाषणात घुसखोरांचा उल्लेख केला, बंगाल निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजप सातत्याने घुसखोरांचा मुद्दा उपस्थित करत आहे. नितीन कायस्थ आहेत. बंगालमध्ये कायस्थ ३% पेक्षा जास्त आहेत. या जातीचे लोक हार-जीतमध्ये मोठी भूमिका बजावतात. पश्चिम बंगालमध्ये ३७ वर्षे कायस्थ मुख्यमंत्री (काँग्रेसचे विधानचंद्र राय १४ वर्षे आणि सीपीएमचे ज्योती बसू २३ वर्षे) राहिले आहेत.

भाजपने अशा व्यक्तीला अध्यक्ष बनवले आहे, ज्याला बंगालची राजकीय आणि सांस्कृतिक समज आहे. बंगालमध्ये ममता बॅनर्जींविरोधात असलेल्या सत्ताविरोधी लाटेचा (अँटी-इन्कम्बन्सी) पूर्ण फायदा घेण्यासाठी भाजपने स्वच्छ प्रतिमेच्या नेत्याला पुढे केले आहे.

आधी भाजप नेत्यांकडून शिंदेसेनेची वरिष्ठांकडे तक्रार

आता शिवसेनेचे राहुल शेवाळे दिल्ली दरबारी, मुंबई महापौरपदाबाबत वाटाघाटींना वेग

दिव्य वतन /वृत्तसेवा

मुंबई- महानगरपालिकेच्या निकालाने भाजपला सर्वात मोठा पक्ष बनवले असले, तरी महायुतीमधील अंतर्गत कलह आता चव्हाट्यावर आला आहे. "उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेमुळे मुंबईत भाजपचे नुकसान झाले असून, त्यांच्या खराब स्ट्राईक रेटचा परिणाम युतीच्या जागांवर झाला," अशी तक्रार राज्यातील भाजप नेत्यांनी केंद्रीय नेतृत्वाकडे केली आहे. दुसरीकडे, महापालिकेच्या रणनितीसाठी शिवसेनेकडून राहुल शेवाळे दिल्लीत पोहोचल्याची माहिती समोर आली आहे. दिल्लीत शेवाळे यांची भाजप नेत्यांसोबत बैठक होणार आहे.राज्यातील भाजप नेत्यांच्या मते, मुंबईत शिंदेंच्या शिवसेनेची कामगिरी निराशाजनक राहिली आहे. एकनाथ शिंदे यांनी हट्टाने जास्त जागा लढवल्या, पण त्या प्रमाणात यश मिळवता

आले नाही. जर भाजपने या जागा लढवल्या असत्या, तर स्वबळावर १०० हून अधिक जागा जिंकता आल्या असत्या, अशी भूमिका या नेत्यांनी दिल्लीत मांडली आहे. मुंबईत भाजपचा स्ट्राईक रेट सर्वाधिक असून त्याखालोखाल उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचा क्रमांक लागतो, तर अजित पवार गटाचा स्ट्राईक रेट सर्वात कमी राहिला आहे.दुसरीकडे, मुंबई महापालिकेचा निकाल लागल्यापासून फोडाफोडीच्या भीतीने शिंदे गटाने आपल्या २९ नगरसेवकांना मुंबईतील एका आलिशान हॉटेलमध्ये ठेवले आहे. भाजप नेत्यांनी शिंदेंच्या या 'हॉटेल पॉलिटिक्स'वरही तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. दरम्यान, या राजकीय पेचातून मार्ग काढण्यासाठी आणि सत्तेचा वाटा ठरवण्यासाठी शिवसेना शिंदे गटाचे खासदार राहुल शेवाळे दिल्लीत पोहोचले आहेत. तिथे भाजपच्या वरिष्ठ नेत्यांसोबत होणाऱ्या बैठकीत महापौरपद आणि पालिकेच्या तिजोरीच्या चाव्या मानल्या जाणाऱ्या 'स्थायी समिती'वर चर्चा होण्याची दाट शक्यता आहे. राजकीय वर्तुळात अशी चर्चा आहे की, महापौरपदाचा हट्ट कायम ठेवून शिंदे गट भाजपवर दबाव निर्माण करत आहे. जर महापौरपद मिळाले नाही, तर किमान स्थायी समिती, सुधार, शिक्षण, बेस्ट आणि आरोग्य यांसारख्या महत्त्वाच्या समित्यांवर आपले वर्चस्व असावे, असा शिंदे गटाचा प्रयत्न आहे. सत्तेच्या वाटाघाटीत आक्रमक भूमिका घेणारे एकनाथ शिंदे सहजासहजी माघार घेत नाहीत, याचा भाजपला यापूर्वीचाही अनुभव आहे. त्यामुळे सुरुवातीला मोठी मागणी करायची आणि नंतर सोयीची तडजोड करून आर्थिक सूत्रे असलेल्या समित्या पदरात पाडून घ्यायची, अशी रणनीती शिंदे गट वापरण्याची चिन्हे आहेत.

3 दिवसांपासून धरणे देत असलेल्या अविमुक्तेश्वरानंद यांना नोटीस

मेळा प्राधिकरणाने सांगितले- 24 तासांत सिद्ध करा की तुम्ही शंकराचार्य आहात!

दिव्य वतन /वृत्तसेवा

प्रयागराज - प्रयागराजमध्ये रथ थांबवल्याच्या निषेधार्थ धरणे धरून बसलेल्या शंकराचार्य अविमुक्तेश्वरानंद यांना माघ मेळा प्रशासनाने नोटीस बजावली आहे. मेळा प्राधिकरणाने त्यांना २४ तासांत हे सिद्ध करण्यास सांगितले आहे की तेच खरे शंकराचार्य आहेत.

सोमवारी रात्री १२ वाजता कानूनगो अनिल कुमार माघ मेळ्यात शंकराचार्यांच्या शिबिरात पोहोचले. त्यांनी शंकराचार्यांच्या शिष्यांना नोटीस घेण्यास सांगितले. मात्र, शिष्यांनी नोटीस घेण्यास नकार दिला. म्हणाले- इतक्या रात्री कोणी नाही. सकाळी घेऊन या.

कानूनगो अनिल कुमार मंगळवारी सकाळी पुन्हा शिबिरात पोहोचले. तिथे गेटवरच नोटीस चिकटवली. नोटीस मेळा प्राधिकरणाच्या उपाध्यक्षांकडून जारी करण्यात आली आहे. यात लिहिले आहे-

प्रयागराज मेळा प्राधिकरणाने नोटीसमध्ये सांगितले आहे की, शंकराचार्य पदाबाबतचा खटला अजूनही सर्वोच्च न्यायालयात सुरू आहे. न्यायालयाने १४ ऑक्टोबर २०२२ रोजी आदेश दिला होता की, जोपर्यंत या प्रकरणाचा अंतिम निर्णय होत नाही, तोपर्यंत कोणालाही शंकराचार्य घोषित केले जाऊ शकत नाही, तसेच कोणाचाही पट्टाभिषेक केला जाऊ शकत नाही.न्यायालयाने स्पष्टपणे सांगितले आहे की, या पदावर कोणालाही बसवण्यावर बंदी आहे. या प्रकरणात अद्याप कोणताही नवीन आदेश आलेला नाही आणि प्रकरण अजूनही न्यायालयात प्रलंबित आहे. याउलट, माघ मेळ्यादरम्यान अविमुक्तेश्वरानंद यांनी त्यांच्या शिबिरात लावलेल्या फलकावर स्वतःला "ज्योतिष्पीठाचे शंकराचार्य" असे लिहिले आहे.

मेळा प्राधिकरणाचे म्हणणे आहे की, हे काम सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाच्या विरोधात आहे, म्हणून त्यांना नोटीस बजावण्यात आली आहे.

इकडे, शंकराचार्य ठाम आहेत की जोपर्यंत प्रशासन माफी मागणार नाही, तोपर्यंत ते आश्रमात प्रवेश करणार नाहीत. त्यांनी काल पत्रकार परिषदेत सांगितले होते की - प्रत्येक मेळ्यात प्रयागराजला येईन, पण शिबिरात नाही, फुटपाथवर राहीन.

महत्त्वाचे...

अहिल्यादेवींची प्रतिमा तोडून हिंदूंचा अपमान:नाना पटोले

नागपूर -काँग्रेस नेते नाना पटोले यांनी पत्रकार परिषद घेत महापालिका निवडणुकीच्या निकालांवर भाष्य करत सरकारवर टीका केली. तसेच आगामी जिल्हा परिषदेच्या निवडणुका बॅलेट पेपेरवर घेण्यात यावी अशी मागणी त्यांनी राज्य निवडणूक आयोगाकडे केली आहे. तसेच मुंबईला महाराष्ट्रापासून तोडण्याचे काम सरकारकडून सुरू झाले असून उद्या मुंबई केंद्रशासित झाली तर त्यात नावीन्य वाटायला नको, असा गंभीर आरोपही पटोले यांनी केला आहे. तसेच अहिल्याबाई होळकरांची प्रतिमा तोडून भारतातील हिंदूंचा अपमान करण्याचे काम या मोदी सरकारने केले असल्याची टीका नाना पटोले यांनी केली आहे. नाना पटोले म्हणाले, देशात हिंदू खतरेमध्ये आहेत असे वल्गना करणाऱ्या या ज्या हिंदुत्ववादी संघटना आहेत, त्यांना आम्ही काय बोलावे, पण या ठिकाणी पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकरांच्या प्रतिमेला तोडून महाराष्ट्राचाच नव्हे, महाराष्ट्रातील धनगर समाजाचाच नव्हे, तर संपूर्ण भारत देशातल्या हिंदूंचा अपमान करण्याचे पाप या मोदी आणि योगी सरकारने केले आहे. ही आमची भूमिका आहे.महानगरपालिकेच्या निवडणुकीवर भाष्य करताना नाना पटोले म्हणाले, मतदार यादीत घोळ झाला होता आणि म्हणून आम्ही निवडणूक आयोगाला सांगितले होते की मतदार याद्या पारदर्शक करावी, जी शाई लावण्यात आली ती कशी पुसली जाते ते तुमच्या माध्यमातून पाहिले आणि दुसरे महत्त्वाचे म्हणजे ईव्हीएमवर आता लोकांचा विश्वास राहिलेला नाही.

बटवाडी शिवारात 2 बिबटे दिसल्याची चर्चा:व्हिडिओ व्हायरल

वाडेगाव - बाळापूर तालुक्यातील बटवाडी येथे १८ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजेच्या सुमारास शेतात जाणाऱ्या शेतकऱ्यांना दोन बिबटे रस्ता ओलांडताना दृष्टीस पडल्याची चर्चा परिसरात सोमवारी वाऱ्यासारखी पसरली. रस्ता ओलांडताना बिबट्यांचा हा व्हिडिओ व्हायरल झाल्याने बटवाडी परिसरातील शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. दरम्यान, याबाबत वन विभागाचे उपवन संरक्षक विश्वास थोरात यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी सांगितले की, अशी कोणतीही माहिती आमच्यापर्यंत आली नाही. व्हायरल झालेला व्हिडिओ हा आपल्याकडील वाटत नाही. त्यामुळे नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये. मात्र रात्रीच्या वेळी शेतात जाताना सावधानता बाळगावी, असे आवाहन करण्यात आले. सध्याच्या परिस्थितीत रब्बी हंगामातील पिकांच्या मशागतीच्या कामे सुरू आहेत. त्यामुळे शेत शिवारात शेतकरी तसेच मजुरांची वर्दळ अधिक प्रमाणात आहे. परंतु शेत शिवारात बिबट्याचा मुक्त संचाराची अफवावजा वार्ता पसरल्याने मोठ्या प्रमाणात भीती निर्माण झाली आहे.

आरोग्य...

2 महिन्यांत बरं होईल हळूहळू खराब होत असलेलं लिव्हर, साचलेली चरबीही होईल साफ, फक्त करा डाएटिशियनचा 'हा' सोपा उपाय

भारतामध्ये फॅटी लिव्हरचे प्रमाण वाढत असण्याचे मुख्य कारण म्हणजे आपली बिघडलेली जीवनशैली आणि आहारातील अति-प्रक्रिया केलेले पदार्थ. यकृतामध्ये चरबी साठणे म्हणजे शरीराच्या नैसर्गिक डिटॉक्स प्रक्रियेत अडथळा निर्माण होणे होय. अनेक लोक पोटाचे विकार किंवा गॅसची औषधे खात राहतात, पण मूळ समस्या यकृतामध्ये असते हे त्यांच्या लक्षात येत नाही. रयान फर्नांडो सांगतात की, आपण जे काही खातो आणि पितो, त्याचा थेट ताण यकृतावर पडतो. जर तुम्ही व्यायाम करत नसाल आणि खूप साखर किंवा तेलकट पदार्थ खात असाल, तर यकृताचे कार्य मंदावते.

मात्र, चांगली बातमी अशी आहे की, यकृत हा शरीरातील असा एकमेव अवयव आहे ज्यामध्ये स्वतःला पुन्हा बरे करण्याची विलक्षण क्षमता आहे. केवळ ८ ते १२ आठवडे शिस्तबद्ध जीवनशैली पाळल्यास यकृतातील चरबी १५-२० टक्क्यांनी कमी होऊ शकते. फॅटी लिव्हरला टाटा-बायबाय करण्यासाठी कोणत्या सवयी अंगीकाराव्यात.

व्यायाम न करण्याची सवय यकृतासाठी सर्वात घातक आहे. रयान फर्नांडो यांच्या मते, दररोज एरोबिक व्यायाम आणि स्ट्रेंथ ट्रेनिंग केल्याने लिव्हरमधील 'ट्रायग्लिसराइड'चे प्रमाण ३० टक्क्यांपर्यंत कमी होऊ शकते. जेव्हा तुम्ही व्यायाम करता, तेव्हा तुमचे स्नायू रक्तातील जास्तीत जास्त ग्लुकोज शोषून घेतात. यामुळे यकृतावरील कामाचा ताण कमी होतो, इन्सुलिनची संवेदनशीलता सुधारते आणि यकृतामध्ये नवीन चरबी साठण्याची प्रक्रिया थांबते.

हाय फायबर आणि लो ग्लायसेमिक आहार

तुमच्या जेवणाच्या ताटातील अर्धा भाग (५०%) भाज्यांनी भरलेला असावा, २५% कॉम्प्लेक्स कार्ब्स (जसे की बाजरी, ओट्स) आणि २५% प्रथिने असावीत. फायबरयुक्त आहार घेतल्याने शरीरातील 'विसेरल फॅट' (अंतर्गत चरबी) कमी होण्यास मदत होते, जे फॅटी लिव्हरचे मूळ कारण आहे. पालेभाज्या, मोड आलेली कडधान्ये आणि फळभाज्या यकृताला डिटॉक्स करण्यास आणि साखरेचे प्रमाण संतुलित राखण्यास मदत करतात.

ओमेगा-३ आणि निरोगी फॅट्सचा समावेश

यकृत निरोगी ठेवण्यासाठी 'सॅच्युरेटेड फॅट' (वनस्पती तूप किंवा अति प्रमाणात लोणी) ऐवजी ओमेगा-३ फॅटी ॲसिड्स आणि निरोगी फॅट्सचा आहारात समावेश करा. शेंगदाणे, बदाम, अक्रोड, अळशीच्या बिया आणि फॅटी फिश हे यकृतातील एन्झाइम्स सुधारण्यासाठी उत्तम आहेत. हे पदार्थ यकृतातील चरबीची निर्मिती कमी करतात आणि रक्तातील ट्रायग्लिसराइड प्रोफाइल सुधारतात, ज्यामुळे यकृताला ताजेतवाने होण्यास मदत मिळते.

साखर, फ्रुक्टोज आणि अल्ट्रा-प्रोसेस्ड फूडवर बंदी

जर तुम्हाला फॅटी लिव्हर रिव्हर्स करायचे असेल, तर पाकिटातील फळांचे रस, बेकरी आयटम्स, साखरयुक्त पेये आणि पॅकेज्ड फूड पूर्णपणे बंद करा. या पदार्थांमधील फ्रुक्टोज थेट यकृतावर परिणाम करतो आणि तिथे चरबी साठवण्यास मदत करतो. ही कट कपात केल्यास अवघ्या ६ ते १२ आठवड्यांत यकृतातील चरबी लक्षणीयरीत्या कमी होते आणि यकृत पुन्हा पूर्वीसारखे कार्य करू लागते.

इन्स्युलिन रेझिस्टन्स आणि हायड्रेशनवर लक्ष

यकृताचे आरोग्य हे तुमच्या इन्सुलिनच्या पातळीवर अवलंबून असते. रक्तातील साखर नियंत्रणात ठेवण्यासाठी पुरेसे पाणी पिणे आणि पुरेशी झोप घेणे तितकेच महत्त्वाचे आहे. यकृताला स्वतःची दुरुस्ती करण्यासाठी वेळेची गरज असते, जी आपल्याला शांत झोपेतून मिळते. अल्कोहोल आणि अतिरिक्त औषधांचे सेवन टाळून यकृताला विश्रांती दिल्यास त्याची नैसर्गिक कार्यक्षमता वाढते आणि शरीर आजारांपासून मुक्त राहते.

आमिर खानने ही साधी ट्रिक वापरुन घटवलं तब्बल 18 किलो वजन, फॉलो करतो ह घरगुती उपाय,

आमिर खान नेहमीच त्याच्या भूमिकेनुसार शरीरात बदल करण्यासाठी ओळखला जातो. 'दंगल' चित्रपटासाठी त्याने ३० किलो वजन वाढवले होते आणि पुन्हा ते कमी करून सर्वांना थक्क केले होते. मात्र, यावेळी आमिरने वजन कमी करण्याचा घेतलेला निर्णय एका जुनाट व्याधीमुळे म्हणजेच 'मायग्रेन'मुळे घेतला होता. आमिरला सतत मायग्रेनचा त्रास होत असे, ज्याचा परिणाम त्याच्या कामावर आणि दैनंदिन जीवनावर होत होता. या त्रासातून मुक्त होण्यासाठी त्याने 'अँटी-इन्फ्लेमेटरी डाएट' फॉलो करण्यास सुरुवात केली.

आमिरच्या मते, हा डाएट प्लॅन त्याच्यासाठी एखाद्या जादूसारखा ठरला. यामुळे केवळ त्याचे १८ किलो वजन कमी झाले नाही, तर त्याच्या मायग्रेनच्या त्रासातही मोठी घट झाली आहे. वाढत्या वयात शरीरातील ऊर्जा टिकवून ठेवण्यासाठी आणि अंतर्गत दाह कमी करण्यासाठी या डाएटचा त्याला मोठा फायदा झाला. वयाच्या साठीतही आमिर जितका तरुण दिसतो, त्यामागे त्याची हीच जिद्द आणि आहारपद्धतीतील बदल कारणीभूत आहेत. आमिरच्या या प्रवासाने हे सिद्ध केले आहे की, योग्य आहार केवळ वजन कमी करत नाही तर शरीरातील गंभीर आजारही बरे करू शकतो.अँटी-इन्फ्लेमेटरी डाएट हा प्रामुख्याने शरीरातील अंतर्गत सूज किंवा दाह कमी करण्यावर लक्ष केंद्रित करतो. यामध्ये प्रक्रिया केलेले पदार्थ पूर्णपणे टाळून नैसर्गिक आणि ताज्या पदार्थांचे सेवन केले जाते. आमिरने आपल्या आहारात ताजी फळे, पालेभाज्या, मासे आणि नैसर्गिकरित्या तयार होणाऱ्या पदार्थांचा समावेश केला. या आहारपद्धतीमुळे शरीरातील रक्ताभिसरण सुधारते आणि रोगप्रतिकारशक्ती वाढते.

धुरंधरच्या भाग-2चे टायटल धुरंधर: द रिव्हेंज:सेन्सर बोर्डाने चित्रपटाचा एक मिनिटापेक्षा जास्त लांबीचा टीझर पास केला, 19 मार्च रोजी चित्रपट प्रदर्शित होईल

धुरंधर चाहत्यांसाठी आनंदाची बातमी आहे, कारण चित्रपटाच्या दुसऱ्या भागाचा टीझर लवकरच प्रदर्शित होणार आहे. याचसोबत चित्रपटाच्या भाग-२ च्या सिक्वेलचे शीर्षकही निश्चित झाले आहे.

१९ जानेवारी म्हणजेच सोमवारी धुरंधर-२ चित्रपटाचा टीझर सेंट्रल बोर्ड ऑफ फिल्म सर्टिफिकेशनकडे पाठवण्यात आला होता. हा टीझर १ मिनिटापेक्षा जास्त लांबीचा आहे. बॉलिवूड हंगामाच्या वृत्तानुसार, धुरंधर भाग-२ चे शीर्षक धुरंधर द रिव्हेंज असे असणार आहे.

सेन्सर बोर्डाने चित्रपटाचा टीझर पाहिल्यानंतर त्याला 'A' (फक्त प्रौढांसाठी) प्रमाणपत्र देऊन पास केले आहे. यापूर्वी धुरंधर पार्ट-1 ला हिंसक दृश्यांमुळे 'ए' प्रमाणपत्र देण्यात आले होते. तरीही, या चित्रपटाने जबरदस्त कमाई करत 'ए' प्रमाणपत्र मिळालेल्या चित्रपटांमध्ये सर्वाधिक कमाई करणारा चित्रपट बनला आहे.

बॉर्डर 2 सोबत थिएटरमध्ये रिलीज होणार धुरंधर 2 चा टीझर

सनी देओल अभिनीत 'बॉर्डर 2' हा चित्रपट 23 जानेवारी रोजी प्रदर्शित होत आहे. हा चित्रपट प्रदर्शित होताच, त्यासोबत धुरंधर 2 चा टीझरही दाखवला जाईल. काही काळानंतर टीझर डिजिटल प्लॅटफॉर्मवर प्रदर्शित होईल. धुरंधरचा पार्ट-1 अजूनही चित्रपटगृहांमध्ये आहे, हे देखील लक्षात घ्या.

19 मार्च रोजी यशच्या चित्रपटाशी धुरंधर 2 चा संघर्ष होणारधुरंधर: द रिवेंज 19 मार्च रोजी प्रदर्शित होणार आहे. याचा बॉक्स ऑफिसवर केजीएफ स्टार यशच्या बहुप्रतिक्षित 'टॉक्सिक' चित्रपटाशी संघर्ष होणार आहे. 'टॉक्सिक'चा टीझर प्रदर्शित झाला आहे, ज्याला खूप पसंती मिळाली आहे. मात्र, बोल्ड सीन्समुळे टीझर वादातही सापडला आहे.

रणवीर सिंगचा चित्रपट धुरंधर हा भारतात सर्वाधिक कमाई करणारा चित्रपट आहे, ज्याने फक्त भारतात 879.75 कोटी रुपये कमावले आहेत. याशिवाय, हा चित्रपट जगभरात दंगल (1963 कोटी) नंतर दुसरा सर्वाधिक कमाई करणारा चित्रपट आहे. या चित्रपटाने जगभरात 1328.23 कोटी रुपयांचे कलेक्शन केले आहे.

आमिर खान इनव्हिटेशनल फंडरेझर 2026 स्पर्धेचे प्रमुख पाहुणे बनले

सोमवारी मुंबईत 18व्या इनव्हिटेशनल फंडरेजर 2026 स्पर्धेचे भव्य आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात बॉलिवूड अभिनेता आमिर खान प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

द गोल्फ फाउंडेशनतर्फे द बॉम्बे प्रेसिडेन्सी गोल्फ क्लबमध्ये आयोजित या कार्यक्रमात आमिर व्यतिरिक्त नवी मुंबई महानगरपालिकेचे (NMMC) आयुक्त डॉ. कैलाश शिंदे आणि मिस इंडिया देखील उपस्थित होत्या.

या स्पर्धेच्या माध्यमातून द गोल्फ फाउंडेशनचा उद्देश खेळाद्वारे सामाजिक आणि धर्मादाय उपक्रमांना पाठिंबा देणे हा आहे.स्पर्धेची सुरुवात सकाळी 8 वाजता झाली, जेव्हा क्लबच्या हिरव्यागार मैदानावर खेळाडूंनी आपले चेंडू मारण्यास सुरुवात केली. आमिर खान संध्याकाळी खेळाडूंचा उत्साह वाढवण्यासाठी पोहोचले.या खास प्रसंगी आमिर खान यांनी खेळ आणि समाजसेवेच्या महत्त्वावरही भर दिला. ते म्हणाले- "गोल्फ केवळ एक खेळ नाही, तर एकाग्रता आणि संयमाचे प्रतीक आहे. अशा निधी संकलनामुळे समाजातील गरजूंपर्यंत मदत पोहोचेल." त्यांच्या या विधानामुळे उपस्थितांनी टाळ्यांचा कडकडाट केला.तर, डॉ. कैलाश शिंदे यांनी सांगितले की, NMMC नेहमीच



सामाजिक उपक्रमांना पाठिंबा देते. मुंबईत खेळ आणि शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी असे कार्यक्रम महत्त्वाचे आहेत. ही स्पर्धा केवळ निधीच गोळा करणार नाही, तर तरुणांना खेळाकडे आकर्षित करेल."

सांगायचे झाल्यास, स्पर्धेत एकूण 64 संघांनी भाग घेतला. बक्षीस वितरण समारंभात विजेत्यांना ट्रॉफी आणि प्रमाणपत्रे देण्यात आली. आयोजकांच्या मते, यावेळी 50 लाख रुपयांपेक्षा जास्त निधी जमा होण्याची अपेक्षा आहे, जो गरीब मुलांच्या शिक्षण आणि आरोग्यावर खर्च केला जाईल. क्लबच्या व्यवस्थापकाने सांगितले, "गेल्या 18 वर्षांपासून ही परंपरा सुरू आहे. आमिरसारखे तारे तिचा दर्जा आणखी उंचावतात."

आमिर खानचे आगमन सकाळपासून क्लबमध्ये चर्चेचा विषय बनले होते. कडेकोट सुरक्षा व्यवस्थेत ते माध्यमांसाठी थांबले.

अक्षय कुमारची सुरक्षा कार ऑटोला धडकली

अपघातात दोन लोक गंभीर जखमी; अभिनेता दुसऱ्या गाडीत पत्नी ट्विंकलसोबत होता

मुंबईतील जुहू परिसरात मुक्तेश्वर रोडजवळ सोमवारी रात्री सुमारे 8.30 वाजता एक मोठा रस्ते अपघात झाला, ज्यात अक्षय कुमारच्या सुरक्षा वाहनाने ऑटो रिक्षाला धडक दिली.

धडक इतकी जोरदार होती की ऑटो चालक आणि त्यात बसलेला एक प्रवासी गंभीर जखमी झाले. दोन्ही जखमींना तातडीने जवळच्या रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले.

जखमी ऑटो-रिक्षा चालकाचा भाऊ मोहम्मद समीरने सांगितले की, रात्री सुमारे 8:30 वाजता त्याचा भाऊ ऑटो चालवत होता. त्याच्या मागे अक्षय कुमारची इनोव्हा कार आणि एक मर्सिडीज धावत होती. तेव्हा मर्सिडीजने इनोव्हाला धडक दिली आणि इनोव्हा पुढे जाऊन ऑटोला धडकली.त्यानंतर ऑटो उलटला, ज्यामुळे त्याचा भाऊ आणि ऑटोमध्ये बसलेला एक प्रवासी ऑटोखाली अडकले. ऑटो पूर्णपणे तुटला आणि त्याच्या भावाची प्रकृती खूप गंभीर आहे.समीरने सांगितले की, त्यांची फक्त एवढीच मागणी आहे की, त्यांच्या भावावर योग्य उपचार व्हावेत आणि ऑटोचे जे

नुकसान झाले आहे, त्याची भरपाई मिळावी. त्यांना याशिवाय दुसरे काहीही नको आहे.अक्षय कुमार पत्नी ट्विंकल खन्नासोबत परदेश प्रवासाहून विमानतळावरून घरी परतत होते, असे सांगितले जात आहे. दोघेही पुढे चाललेल्या दुसऱ्या गाडीत बसले होते. अपघाताची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी पोहोचले आणि त्यांनी तपास सुरू केला. जुहू पोलिसांनी मर्सिडीज चालकाविरुद्ध निष्काळजीपणे गाडी चालवल्याचा गुन्हा दाखल केला आहे.

अपघाताचा व्हिडिओही समोर आला आहे, ज्यात अक्षयची गाडी ऑटोवर उलटलेली दिसत आहे. सोशल मीडियावर अपघाताचे अनेक

व्हिडिओ व्हायरल होत आहेत. दिलासादायक बाब म्हणजे या अपघातात कोणाचाही जीव गेला नाही, मात्र अपघातात सहभागी असलेल्या सर्व गाड्यांचे मोठे नुकसान झाले.या संपूर्ण प्रकरणावर अक्षय कुमारच्या टीमकडून अद्याप कोणतेही अधिकृत निवेदन जारी करण्यात आलेले नाही.

रश्मिका मंदानाने सांगितली सिकंदर फ्लॉप होण्याची कारणे

जेव्हा स्क्रिप्ट ऐकली तेव्हा ती वेगळी होती, शूटिंग दरम्यान कथा बदलली

सलमान खान आणि रश्मिका मंदाना अभिनीत 'सिकंदर' हा चित्रपट २०२५ मधील सर्वात मोठा फ्लॉप ठरला. चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर अत्यंत खराब कामगिरी केली आणि चित्रपटाचा खर्चही वसूल होऊ शकला नाही. आता चित्रपटाची नायिका रश्मिका मंदानाने चित्रपटाच्या अपयशावर भाष्य केले आहे.

रश्मिकाने नुकतीच तेलुगू पत्रकार प्रेमासोबत 'सिकंदर'बद्दल चर्चा केली. तिने चित्रपटाबद्दल बोलताना सांगितले की, "नंतर जे घडले ते पूर्णपणे वेगळे होते, पण जेव्हा मी स्क्रिप्ट ऐकली होती, तेव्हा ती खरोखरच खूप वेगळी होती. पण चित्रपटांमध्ये असे अनेकदा घडते.

जेव्हा तुम्ही ऐकता, तेव्हा ती एक वेगळी कथा असते. पण चित्रपट बनवताना, अभिनय, संपादन आणि प्रदर्शनाच्या वेळेनुसार गोष्टी बदलतात. ही खूप सामान्य गोष्ट आहे. 'सिकंदर'सोबतही असेच घडले."

सांगायचं झाल्यास, सिकंदर फ्लॉप झाल्यानंतर चित्रपटाचे दिग्दर्शक ए आर मुरुगदास यांनी भाषा आणि सलमान खानला दोषी ठरवलं होतं. त्यांनी आपल्या एका मुलाखतीत म्हटलं होतं की स्टार्ससोबत काम करणं सोपं नसतं. दिवसाच्या सीनसाठीही आम्हाला रात्री शूट करावं लागत होतं, कारण ते रात्री 8 वाजता सेटवर यायचे. आम्ही ते लोक आहोत. आम्हाला सकाळपासून शूट करण्याची सवय आहे, पण तिथे तसं होत नव्हतं.

भाषेबद्दल बोलताना ते म्हणाले- 'माझी मातृभाषा तमिळमध्ये काम करणे, ही माझी सर्वात मोठी ताकद आहे कारण मला माहित आहे की येथे काय चालते. सोशल मीडियावर ट्रेंडिंग कॅप्शन आणि डायलॉग वापरून तरुण प्रेक्षकांना आकर्षित करता येते. पण दुर्दैवाने, मी हे इतर भाषांमध्ये, विशेषतः हिंदीमध्ये करू शकत नाही. तिथे चित्रपटाच्या यशासाठी मी फक्त पटकथेवरच अवलंबून राहू शकतो.'मुरुगदास यांच्या या आरोपांवर सलमानने 'बिग बॉस 19' मध्ये प्रतिक्रिया देत त्यांच्यावर टोमणा मारला होता. सलमान म्हणाला होता की, तो उशिरा येत असे कारण त्याची बरगडी तुटली होती आणि त्याला जीवे मारण्याच्या धमक्या मिळत होत्या, ज्यामुळे सुरक्षेची गरज होती. नंतर अभिनेत्याने मुरुगदासच्या 'मद्रासी' चित्रपटाचा उल्लेख करत सांगितले की, तो 'सिकंदर'पेक्षा मोठी ब्लॉकबस्टर होती आणि त्यात अभिनेता सकाळी 6 वाजता यायचा, तरीही चित्रपट यशस्वी झाला, तर 'सिकंदर'चा कथानक चांगला होता.



घटस्फोटाच्या बातम्यांवर नेहा कक्करने सोडले मौन:म्हणाली- माझे पती आणि कुटुंबाला यात ओढू नका, एक दिवसापूर्वी नात्यातून ब्रेक घेण्याबद्दल बोलली होती

नेहा कक्कर तिच्या त्या पोस्टमुळे वादात सापडली, ज्यात तिने म्हटले होते की ती सर्व नात्यांमधून ब्रेक घेत आहे. यानंतर तिच्या घटस्फोटाच्या बातम्या चर्चेत आल्या. मात्र, आता गायिकेने स्वतः स्पष्ट केले आहे की ती घटस्फोट घेत नाहीये. याशिवाय, तिने या प्रकरणात कुटुंबाला ओढू नये अशी विनंती केली आहे.

पुढे नेहाने लिहिले आहे की, मला काही इतर लोक आणि सिस्टीममुळे त्रास आहे, त्याच गोष्टीमुळे मी दुःखी आहे. आशा आहे की तुम्ही समजून घ्याल आणि माझ्या पतीला व माझ्या कुटुंबाला यापासून दूर ठेवाल. आणि हो, मी मान्य करते की सोशल मीडियावर पोस्ट करताना मी इतकी भावूक व्हायला नको होती, कारण लोकांना खूप चांगले माहीत आहे की "राईचा पर्वत कसा बनवला जातो." धडा मिळाला.

शेवटी गायिकेने लिहिले, आता मी माझ्या वैयक्तिक आयुष्याबद्दल बोलणार नाही, भाईसाहब. बिचारी भावनिक नेहू या जगासाठी खूप जास्त भावनिक आहे. सॉरी आणि धन्यवाद माझ्या नेहाट्र्स. काळजी करू नका, मी लवकरच धमाकेदार पुनरागमन करेन. खूप खूप प्रेम.

नेहा कक्करने सोमवारी एक भावनिक पोस्ट शेअर केली होती की ती सर्व नात्यांमधून ब्रेक घेत आहे. तिने लिहिले, यानंतर नेहाने आणखी एक स्टोरी पोस्ट करून पापाराझी आणि चाहत्यांना तिचे फोटो न काढण्याची विनंती केली. तिने लिहिले, "मी पापाराझी आणि चाहत्यांना विनंती करते की माझे फोटो अजिबात काढू नका. माझ्या गोपनीयतेचा आदर करा आणि मला शांततेत जगू द्या. नो कॅमेरा प्लीज।"

उल्लेखनीय आहे की, अलीकडेच नेहा कक्कर आणि तिचा भाऊ टोनी कक्कर यांना त्यांच्या 'कँडी शॉप' गाण्यावरून मोठ्या प्रमाणात ट्रोलिंगचा सामना करावा लागला होता. सोशल मीडियावर युजर्सनी गाण्यातील डान्स मूव्हसना 'स्वस्त' आणि 'अश्लील' असे संबोधत के-पॉपची नक्कल केल्याचा आरोप केला होता.

यापूर्वी 2025 मध्ये नेहा त्यावेळीही चर्चेत आली होती, जेव्हा मेलबर्न कॉन्सर्टदरम्यान स्टेजवर रडतानाचा तिचा व्हिडिओ व्हायरल झाला होता. तिच्यावर आरोप होता की ती कॉन्सर्टमध्ये तीन तास उशिरा पोहोचली, त्यानंतर प्रेक्षकांनी नाराजी व्यक्त केली. मात्र, नेहाने आयोजकांवर चुकीची माहिती पसरवल्याचा आरोप केला होता.

नेहा कक्करच्या करिअरबद्दल बोलायचं झालं तर ते खूप संघर्षमय राहिलं आहे. तिने अवघ्या चार वर्षांच्या वयात धार्मिक कार्यक्रमांमध्ये भजन गाऊन आपल्या कुटुंबाला आर्थिक मदत करण्यास सुरुवात केली होती. नंतर ती इंडियन आयडल सीझन 2 मध्ये दिसली, जिथे ती टॉप 10 पर्यंत पोहोचली.

नेहाने 'आंख मारे',

'दिलबर', 'हौली हौली', 'मोरनी बांके' यांसारखी अनेक हिट गाणी दिली आहेत आणि ती म्युझिक रिॲलिटी शोमध्ये परीक्षक म्हणूनही दिसत राहिली आहे.

अर्थविश्व...

सेन्सेक्स 300 अंकांनी घसरून 82,950 वर:निफ्टीही 100 अंकांनी घसरला, झोमॅटो आणि बजाज फायनान्सचे शेअर्स 3% पर्यंत घसरले

शेअर बाजारात आठवड्याच्या दुसऱ्या व्यावसायिक दिवशी म्हणजेच सोमवार (20 जानेवारी) रोजी घसरण दिसून येत आहे. सेन्सेक्स 300 अंकांनी घसरून 82,950 च्या पातळीवर व्यवहार करत आहे. निफ्टीमध्येही 100 अंकांची घसरण आहे, तो 25,450 च्या पातळीवर व्यवहार करत आहे. सेन्सेक्सच्या 30 शेअर्सपैकी 6 मध्ये वाढ आणि 24 मध्ये घसरण दिसून येत आहे. झोमॅटो आणि बजाज फायनान्सच्या शेअर्समध्ये 3% पर्यंत घसरण झाली आहे.

जागतिक बाजारात घसरण

आशियाई बाजारात कोरियाचा कोस्पी 0.017% वर 4,905 वर आणि जपानचा निक्केई इंडेक्स 1.22% खाली 52,931 वर व्यवहार करत आहे.हाँगकाँगचा हँगसेंग इंडेक्स 0.075% खाली 26,543 वर आणि चीनचा शांघाय कंपोझिट इंडेक्स 0.30% खाली 4,101 वर व्यवहार करत आहे.

16 जानेवारी रोजी अमेरिकेचा डाऊ जोन्स 0.17% घसरून 49,359 वर बंद झाला. नॅसडॅक 0.062% आणि S&P-500 0.064% घसरला होता.

परदेशी गुंतवणूकदारांनी ₹3,262 कोटींचे शेअर्स विकले

19 जानेवारी रोजी परदेशी संस्थागत गुंतवणूकदारांनी (FIIs) ₹3,262 कोटींचे शेअर्स विकले. याच काळात देशांतर्गत संस्थागत गुंतवणूकदारांनी (DIIs) ₹4,234 कोटींचे शेअर्स खरेदी केले.

डिसेंबर 2025 मध्ये FIIs ने एकूण ₹34,350 कोटींचे शेअर्स विकले होते. याच काळात बाजाराला आधार देणाऱ्या DIIs ने ₹9,620 कोटींचे शेअर्स खरेदी केले होते.

काल सेन्सेक्स 324 अंकांनी घसरून बंद झाला होता

शेअर बाजारात 19 डिसेंबर रोजी घसरण दिसून आली. सेन्सेक्स 324 अंकांनी घसरून 83,246 वर बंद झाला. निफ्टीमध्येही 108 अंकांची घसरण झाली. तो 25,585 वर बंद झाला होता.

नवीन आयकर कायदा 1 एप्रिल 2026 पासून लागू होणार:असेसमेंट वर्षाऐवजी 'टॅक्स इयर' येईल, ITR फाइलिंग सोपे!

केंद्र सरकारने जुना आयकर कायदा 1961 बदलून नवीन आयकर कायदा 2025 आणला आहे, जो 1 एप्रिल 2026 पासून लागू होईल. यामध्ये सर्वात मोठा बदल म्हणजे 'असेसमेंट इयर' आणि 'प्रीव्हियस इयर' ऐवजी 'टॅक्स इयर' वापरला जाईल.

यामुळे सामान्य करदात्याला ITR दाखल करताना कमी गोंधळ होईल, कारण उत्पन्न मिळवण्याचे वर्ष आणि कर अहवाल देण्याचे वर्ष एकच असेल. हा बदल कर प्रणाली सोपी करण्याच्या दिशेने एक मोठे पाऊल आहे.

जुन्या व्यवस्थेत काय गोंधळ होता?

आतापर्यंत आयकर कायदा 1961 मध्ये, उत्पन्न मिळवण्याचे वर्ष आर्थिक वर्ष (FY) म्हणून ओळखले जात होते आणि त्यावर कराचे मूल्यांकन पुढील वर्षात होत असे, ज्याला असेसमेंट इयर (AY) म्हटले जात होते.उदाहरणार्थ, FY 2024-25 मध्ये कमावलेले उत्पन्न AY 2025-26 मध्ये अहवालित आणि मूल्यांकित केले जात होते. यामुळे सामान्य माणसाला उत्पन्न कोणत्या वर्षाचे आहे आणि मूल्यांकन कोणत्या वर्षाचे आहे हे समजण्यात अडचण येत होती.

'टॅक्स इयर' मुळे काय बदलेल?

नवीन कायद्यात 'टॅक्स इयर' हे उत्पन्न कमावण्याचे आणि अहवाल देण्याचे एकच वर्ष मानले जाईल. म्हणजेच, ज्या वर्षी उत्पन्न कमावले, त्याच वर्षी त्याचा कर भरला जाईल आणि मूल्यांकन केले जाईल. यामुळे दोन वेगवेगळ्या संज्ञांची गरज संपेल.

कर तज्ञांचे म्हणणे आहे की नवीन आयकर कायदा 2025 'टॅक्स इयर' ही संकल्पना आणत आहे. हे 'प्रीव्हियस इयर' आणि 'असेसमेंट इयर' यांना 1 एप्रिल 2026 पासून बदलून टाकेल.

सामान्य माणसासाठी असेसमेंट इयर समजणे कठीण होते, जसे की आर्थिक वर्ष 2024-25 चे उत्पन्न मूल्यांकन वर्ष 2025-26 मध्ये जात असे. आता टॅक्स इयरमुळे समजणे सोपे होईल.

ITR फाइलिंगमध्ये काय बदल होईल?

नवीन व्यवस्थेत, ज्या टॅक्स इयरमध्ये उत्पन्न कमावले, त्याच टॅक्स इयरमध्ये ITR फाइल केला जाईल. कर दर किंवा स्लॅबमध्ये कोणताही बदल नाही, फक्त संज्ञा आणि प्रक्रिया सोपी होईल.

तज्ञांचे म्हणणे आहे की नवीन कायदा 'असेसमेंट इयर'च्या जागी 'टॅक्स इयर' आणत आहे. टॅक्स इयर उत्पन्नाशी संबंधित आर्थिक वर्षाशी जुळेल, जुनी तफावत संपेल. करदात्यांनी या नवीन संज्ञेशी परिचित असले पाहिजे.

2025-26 ITR फाइलिंगवर काय परिणाम?

हा बदल 1 एप्रिल 2026 पासून लागू होईल, त्यामुळे याचा पूर्ण परिणाम ITR फाइलिंग 2026-27 (टॅक्स वर्ष 2026-27) पासून दिसेल. पण 2025-26 च्या ITR मध्येही फॉर्म्सची भाषा बदलू शकते.

नोटीस, असेसमेंट आणि इतर कागदपत्रांमध्ये 'टॅक्स वर्ष' असे लिहिले जाईल. यामुळे टॅक्स कम्युनिकेशन अधिक स्पष्ट आणि सरळ होईल.

सामान्य करदात्यासाठी याचा काय अर्थ?

सोप्या शब्दांत सांगायचे तर, आता "मागील वर्षाचे उत्पन्न, पुढील वर्षी मूल्यांकन" हा गोंधळ संपेल. उत्पन्न आणि कर फाइलिंगचे वर्ष एकच असेल.

बांगलादेशनंतर पाकिस्तानचीही वर्ल्ड कपवर बहिष्काराची धमकी

भारतामधील स्पर्धा धोक्यात, आयसीसीच्या निर्णयावर लक्ष...

नवी दिल्ली : बांगलादेशचे प्रकरण आता जास्तच चिघळत चालले आहे आणि त्यामुळे आयसीसीवरील दडपण चांगलेच वाढले आहे. यापूर्वी फक्त बांगलादेशने भारतामधील वर्ल्ड कपवर बहिष्कार घालण्याची भाषा केली होती. पण आता त्यांना बळ मिळालं आहे ते पाकिस्तानचं. कारण बांगलादेशला पाठिंबा देण्यासाठी आता पाकिल्तान भारतामधील वर्ल्ड कपवर बहिष्कार घालण्याची धमकी देत आहे. त्यामुळे भारतामधील वर्ल्ड कपची स्पर्धा धोक्यात आली असल्याचे म्हटले जात आहे. पण यावेळी आयसीसी काय निर्णय घेणार, हे महत्वाचे ठरणार आहे. कारण पाकिस्तानच्या निर्णयाने आयसीसीला मोठा धक्का बसू शकतो.

बांगलादेश क्रिकेट बोर्डाशी चर्चा करण्यासाठी आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने ढाका येथे बैठकही घेतली होती. त्यावेळी आम्हाला क ऐवजी ब गटात स्थान द्यावे असा पर्याय बीसीबीने सूचवला होता. ब गटात यजमान श्रीलंका, ऑस्ट्रेलिया, ओमान आणि झिम्बाब्वे या संघांचा समावेश आहे. या गटात स्थान दिल्यास बांगलादेशचे सगळे सामने (गटातील) श्रीलंकेत होतील. पण यावेळी आयर्लंडच्या संघाने नकार दिला. त्यामुळे बांगलादेशच्या संघाने भारतामधील वर्ल्ड कपवर बहिष्कार टाकण्याची धमकी दिली होती. त्यावर आयसीसीने काहीच म्हटले नाही. पण आता बांगलादेशला मदत करण्यासाठी पाकिस्तान पुढे आला आहे. पाकिस्तानमधील जिओ या वाहिनीने एक वृत्ता दिले असून त्यानुसार आता पाकिस्तान बांगलादेशबरोबर भारतमधील वर्ल्ड कपवरर बहिष्कार घालण्यासाठी तयार असल्याचे म्हटले आहे. पाकिस्तानने विचार करून हा निर्णय घेतल्याचे दिसत आहे.

फक्त बांगलादेशने वर्ल्ड कपवर बहिष्कार घातला तर आयसीसी त्यांना स्पर्धेबाहेरे करू शकते, पण त्यांच्याबरोबर पाकिस्तानेही दवाव आणला तर नक्कीच आयसीसीची कोंडी होऊ शकते. त्यामुळे आयसीसीला बांगलादेश आणि पाकिस्तान यांच्यापुढे झुकावे लागेल, असे म्हटले जात आहे. कारण आयसीसी एकाच वर्ल्ड कपमधून दोन देशांना बाहेर काढणू शकत नाही, असे म्हटले जाते. यामध्ये सर्वात महत्वाचा ठरणार आहे तो आयसीसीची निर्णय. आयसीसीने बांगलादेशला तर डेडलाईन दिली आहे. पण आता पाकिस्तानच्या निर्णयाबाबत ते कोणती भूमिका घेतात, याकडे आता सर्वांचे लक्ष लागलेले आहे.

बांगलादेशसह पाकिस्ताननेही बहिष्कार टाकला तर आयसीसीकडे तीन पर्याय

नवी दिल्ली : बांगलादेशनंतर आता पाकिस्ताननेही भारताला झुकवण्याचे प्रयत्न सुरु केले आहेत. बांगलादेशनंतर आता पाकिस्तानने भारतामध्ये होणाऱ्या वर्ल्ड कपवर बहिष्कार टाकण्याची धमकी दिली आहे.

त्यामुळे आता भारतात ही स्पर्धे होणार की नाही, अशी चर्चा सुरु झाली आहे. पण आता आयसीसीची भूमिका सर्वत महत्वाची असणार आहे. जर बांगलादेश आणि पाकिस्तान या दोन्ही देशांनी जर भारतामधील वर्ल्ड कपवर बहिष्कार टाकला तर त्यासाठी आयसीसीकडे तीन पर्याय उपलब्ध असतील. यामधला दुसरा पर्याय तर सर्वात जबरदस्त आहे.

पहिला पर्याय...

बांगलादेशपाठोपाठ जर पाकिस्तानही भारतामधील वर्ल्ड कपवर बहिष्कार टाकत असेल तर ही गंभीर बाब समजली जाऊ शकते. कारण दोन देश जर बहिष्कार टाकण्याची भाषा करत असतील तर त्याला विचार आयसीसीला करावा लागेल. या प्रकरणी जर आयसीसीला दोन्ही देशांना शांत करायचं असेल तर ते त्यांची मागणी मान्य करू शकतात.

दुसरा पर्याय..

बांगलादेश आणि पाकिस्तान आता भारताला घेरण्यासाठी मोठं पाऊल उचलण्याच्या तयारीत आहेत. कारण या टी २० वर्ल्ड कपचे यजमानपद भारताकडे आहे. त्यामुळे जर दोन देशांनी बहिष्कार टाकला तर भारताबाबत वाईट मत तयार होऊ शकतं आणि सुरक्षेच्या प्रश्नावरून कोणताही निर्णय घेतला जाऊ शकतो. पण आयसीसी हे सर्व प्रकरण हाताळत असते.

तिसरा पर्याय..

बांगलादेश आणि पाकिस्तान एकत्र येऊन जर वर्ल्ड कपवर बहिष्कार टाकणार असतील, तर आयसीसीला या दोन्ही देशांचा वेगळा विचार करावा लागेल. बांगलादेशची मागणी सर्वांना माहिती आहे. पण पाकिस्तान बहिष्कार का टाकत आहे, हे त्यांनी अद्याप सांगितलेलं नाही. पाकिस्तानचे सामने तर भारताबाहरे होणार आहे, हे त्यांच्या मनासारखं ठरलेलं आहे.

ऑस्ट्रेलियन ओपनमध्ये तेरेजा व्हॅलेंटोव्हाने अनपेक्षित विजय मिळवला

ऑस्ट्रेलियाची नंबर-1 महिला टेनिसपटू माया जॉइंटला हरवले

ऑस्ट्रेलियाची नंबर-1 महिला टेनिसपटू माया जॉइंटला ऑस्ट्रेलियन ओपनच्या पहिल्या फेरीत पराभवाला सामोरे जावे लागले आहे. जागतिक क्रमवारीत 31 व्या स्थानावर असलेल्या जॉइंटला चेक प्रजासत्ताकच्या 18 वर्षीय तेरेजा व्हॅलेंटोव्हाने सरळ सेटमध्ये 6-4, 6-4 असे हरवले. व्हॅलेंटोव्हाची जागतिक क्रमवारी 54 आहे. दुसरीकडे, महिला एकेरीची गतविजेती मॅडिसन कीजनेही विजयाने सुरुवात केली आहे.

या पराभवामुळे जॉइंट केवळ स्पर्धेतून बाहेर पडली नाही, तर दुसऱ्या फेरीत पोहोचल्यावर मिळणाऱ्या 2.25 लाख डॉलर (सुमारे 1.8 कोटी रुपये) च्या बक्षीस रकमेलाही मुकली.

मंगळवारी मेलबर्नच्या जॉन केन एरिना येथे खेळल्या गेलेल्या सामन्यात जॉइंटची कामगिरी निराशाजनक राहिली. 19 वर्षीय खेळाडूने सामन्यात 8 डबल फॉल्ट केले, तिची सर्व्हिस 5 वेळा ब्रेक झाली आणि तिला एकूण 17 ब्रेक पॉइंटचा सामना करावा लागला.

सामना जिंकल्यानंतर व्हॅलेंटोव्हा म्हणाली, 'हे माझ्यासाठी अविश्वसनीय आहे. वर्षाच्या सुरुवातीला मी याची अपेक्षा केली नव्हती. मी ITF स्पर्धा खेळत होते आणि आता ऑस्ट्रेलियन ओपनच्या मुख्य ड्रॉमध्ये विजय मिळवत आहे.'

मॅडिसन कीजने युक्रेनच्या ओलेक्सांद्रा ओलीनिकोवाला हरवलेडिफेंडिंग चॅम्पियन मॅडिसन कीजने सुरुवातीचा दबाव सहन केल्यानंतर पहिल्या फेरीत युक्रेनच्या ओलेक्सांद्रा ओलीनिकोवाला 7-6 (6), 6-1 ने हरवून दुसऱ्या फेरीत स्थान मिळवले.रॉड लेव्हर एरिनामध्ये खेळल्या गेलेल्या सामन्यात नवव्या मानांकित कीज सुरुवातीला लयीत दिसली नाही. पहिल्या सेटमध्ये ती 0-4 ने मागे पडली, पण शानदार पुनरागमन करत तिने सामना टायब्रेकपर्यंत नेला. टायब्रेकमध्येही ओलीनिकोवाने 4-0 ची आघाडी घेतली होती आणि तिच्याकडे दोन सेट पॉइंट्सही होते, पण ती त्यांचा फायदा घेऊ शकली नाही. इथूनच कीजला पुनरागमनाची संधी मिळाली आणि तिने पहिला सेट आपल्या नावावर केला. हा सेट एक तास 12 मिनिटे चालला. तोच, दुसरा सेट तिने सहज जिंकला. सामन्यानंतर ऑन-कोर्ट मुलाखतीत कीज म्हणाली, 'सुरुवातीला मी खूप नर्व्हस होते. पण मी आनंदी आहे की मी परत आले आणि हा सामना जिंकू शकले.'

तर, तरुण ऑस्ट्रेलियन खेळाडू टायला प्रेस्टनने उत्कृष्ट कामगिरी करत अनुभवी चिनी खेळाडू झांग शुआईला 6-3, 2-6, 6-3 अशा फरकाने हरवले.

ही प्रेस्टनची ग्रँड स्लॅममधील पहिली एकेरी (सिंगल्स) विजय आहे, जो तिने तिसऱ्या प्रयत्नात मिळवला. 20 वर्षीय प्रेस्टनला स्पर्धेत वाईल्डकार्ड एन्ट्री मिळाली होती. यापूर्वी ती होबार्ट इंटरनॅशनलच्या उपांत्य फेरीपर्यंत पोहोचली होती, जिथे तिने माजी यूएस ओपन चॅम्पियन एम्मा राडुकानूला हरवले होते.सामन्यानंतर प्रेस्टन म्हणाली, 'हा माझा पहिला ग्रँड स्लॅम विजय आहे आणि याचा माझ्यासाठी खूप अर्थ आहे. माझे आई-वडील आणि बहिणीचे येथे असणे याला आणखी खास बनवते.'

जोबर्ग सुपर किंग्ज SA20च्या प्लेऑफमध्ये पोहोचले

पार्ल रॉयल्सला 45 धावांनी हरवले; डू प्लॉयने नाबाद 54 धावा केल्या

SA-20 मध्ये जॉबर्ग सुपर किंग्ज (JSK) ने पार्ल रॉयल्सला 45 धावांनी हरवून (बोनस पॉइंटसह) प्लेऑफमधील आपले स्थान निश्चित केले. हा सामना सोमवारी संध्याकाळी बोलंड पार्क येथे खेळला गेला. प्रथम फलंदाजी करताना JSK ने 6 गडी गमावून 166 धावा केल्या, प्रत्युत्तरात पार्ल रॉयल्सचा संघ 18.1 षटकांत 122 धावांवर सर्वबाद झाला.

डु प्लॉयने दबावात सामना फिरवला

प्लेऑफच्या शर्यतीत टिकून राहण्यासाठी हा सामना जॉबर्ग सुपर किंग्ससाठी 'करो या मरो' असा होता. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना संघाची सुरुवात सामान्य होती, परंतु शेवटच्या षटकांमध्ये डु प्लॉयने सामन्याचे चित्र पालटले.

त्याने 27 चेंडूंमध्ये नाबाद 54 धावा केल्या, ज्यात 5 चौकार आणि 3 षटकारांचा समावेश होता. शेवटच्या दोन षटकांत 32 धावा जोडल्या गेल्या, ज्यामुळे धावसंख्या 166 पर्यंत पोहोचू शकली. जखमी फाफ डु प्लेसिसच्या जागी शेवटच्या क्षणी संघात समाविष्ट केलेल्या डु प्लॉयने वकार सलामखेलच्या एका षटकात दोन षटकार आणि एक चौकार मारला.

मध्यक्रमाला वेग मिळाला नाही

त्याआधी नील टिमर्सने 39 चेंडूंमध्ये 37 धावा केल्या. मायकल पेपर आणि मॅथ्यू डी विलियर्सने प्रत्येकी 23 चेंडूंमध्ये 27-27 धावा जोडल्या, पण धावगती अपेक्षित नव्हती. पार्ल रॉयल्सकडून वकार सलामखेलने 2 बळी घेतले.

फिरकी जोडीने पार्ल रॉयल्सचा दम काढला

167 धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना पार्ल रॉयल्सचा संघ सुरुवातीपासूनच दबावाखाली दिसला. कर्णधार डेव्हिड मिलर दुखापतीमुळे खेळला नाही, त्यामुळे फलंदाजी क्रम कमकुवत झाला.

लुआन-ड्रे प्रिटोरियसने 25 चेंडूंमध्ये 32 धावा आणि डॅन लॉरेन्सने 29 चेंडूंमध्ये 45 धावा केल्या, पण संघ सावरू शकला नाही.जेएसकेकडून प्रेनेलन सुब्रायन आणि इम्रान ताहिरच्या फिरकी जोडीने सामना एकतर्फी केला. दोघांनी 7 षटकांत केवळ 31 धावा देऊन 5 बळी घेतले. सुब्रायनने 14 धावांत 3 बळी, तर ताहिरने 17 धावांत 2 बळी घेतले.

गुणतालिकेचे समीकरण

ग्रुप स्टेज (गट टप्पा) नंतर सनरायझर्स ईस्टर्न केप 28 गुणांसह अव्वल स्थानी राहिली. बुधवारी किंग्समीड येथे होणाऱ्या क्वालिफायर-1 मध्ये ती प्रिटोरिया कॅपिटल्स (24 गुण) शी भिडेल.

तर, पार्ल रॉयल्स (24 गुण) आणि जॉबर्ग सुपर किंग्स (22 गुण) यांच्यात गुरुवारी सेंच्युरियन येथे एलिमिनेटर सामना खेळला जाईल.

सायना नेहवालने घेतली निवृत्ती:म्हणाली- गुडघ्याच्या समस्येने त्रस्त होते; शेवटची 2023 मध्ये सिंगापूर ओपनमध्ये खेळली होती



भारताची स्टार बॅडमिंटनपटू सायना नेहवालने व्यावसायिक बॅडमिंटनमधून निवृत्ती घेतल्याची अधिकृत पुष्टी केली आहे. तिने सांगितले की, गुडघ्याच्या जुन्या आणि गंभीर आजारामुळे आता तिला उच्च स्तरावर स्पर्धा करणे शक्य नाही.

औपचारिक घोषणेशिवायच खेळ सोडला होता

सायनाने शेवटचा सामना 2023 मध्ये सिंगापूर ओपनमध्ये खेळला होता. मात्र, त्यावेळी तिने निवृत्तीची कोणतीही औपचारिक घोषणा केली नव्हती. एका पॉडकास्टमध्ये सायना म्हणाली, 'मी दोन वर्षांपूर्वीच खेळणे बंद केले होते. मी माझ्या नियमांनुसार खेळायला सुरुवात केली आणि माझ्या नियमांनुसारच सोडला, त्यामुळे मला घोषणा करणे आवश्यक वाटले नाही.'

गुडघ्याच्या गंभीर आजारामुळे निवृत्ती घ्यावी लागली

सायनाच्या मते, त्यांच्या गुडघ्यांमधील कूर्चा (कार्टिलेज) पूर्णपणे झिजली आहे आणि त्यांना संधिवात (आर्थराइटिस) झाला आहे.

म्हणाली,'जेव्हा तुम्ही खेळूच शकत नाही, तेव्हा तिथेच थांबायला हवे. आता माझ्यासाठी हे पुढे चालू ठेवणे खूप कठीण झाले होते.' पूर्वी त्या दिवसातून 8–9 तास सराव करू शकत होत्या, पण आता 1–2 तासांतच गुडघ्याला सूज येत असे, ज्यामुळे पुढील सराव करणे शक्य नव्हते.

दुखापतीनंतरही शानदार पुनरागमन, पण दिलासा मिळाला नाही

सायनाचे करिअर रिओ ऑलिम्पिक २०१६ दरम्यान झालेल्या गुडघ्याच्या गंभीर दुखापतीमुळे खूप प्रभावित झाले. यानंतरही तिने २०१७ मध्ये वर्ल्ड चॅम्पियनशिपमध्ये कांस्यपदक आणि २०१८ च्या कॉमनवेल्थ गेम्समध्ये सुवर्णपदक जिंकून शानदार पुनरागमन केले.

मात्र, गुडघ्याची समस्या वारंवार उद्भवत राहिली. २०२४ मध्ये सायनाने सार्वजनिकरित्या सांगितले होते की तिला गुडघ्यांमध्ये आर्थरायटिस आहे आणि कार्टिलेज पूर्णपणे झिजले आहे, ज्यामुळे सर्वोच्च स्तरावर खेळणे जवळजवळ अशक्य झाले आहे.

ऑलिम्पिक पदक जिंकणारी भारताची पहिली बॅडमिंटन खेळाडू

माजी वर्ल्ड नंबर-१ सायनाने लंडन ऑलिम्पिक-२०१२ मध्ये भारताला कांस्यपदक मिळवून दिले होते. ती ऑलिम्पिक पदक जिंकणारी पहिली भारतीय बॅडमिंटन खेळाडू आहे. तिने ३ ऑलिम्पिक गेम्समध्ये भारताचे प्रतिनिधित्व केले. सायनाने २०१० आणि २०१८ च्या कॉमनवेल्थ गेम्समध्ये सुवर्णपदके जिंकली आहेत.

राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत सुवर्णपदक

सायनाने 2010 आणि 2018 च्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत सुवर्णपदक जिंकले होते. सायनाने 2008 मध्ये बॅडमिंटन वर्ल्ड फेडरेशन (BWF) वर्ल्ड ज्युनियर चॅम्पियनशिप जिंकून प्रसिद्धी मिळवली होती. त्याच वर्षी तिने पहिल्यांदा ऑलिम्पिकमध्ये भाग घेतला. ती ऑलिम्पिक उपांत्यपूर्व फेरीत पोहोचणारी पहिली भारतीय महिला ठरली.तिने हॉंगकॉंगच्या तत्कालीन वर्ल्ड नंबर-5 खेळाडू वांग चेनला हरवले होते, पण इंडोनेशियाच्या मारिया क्रिस्टिन युलियांतीकडून हरली. 2009 मध्ये, सायना BWF सुपर सिरीज स्पर्धा जिंकणारी पहिली भारतीय ठरली.

महत्त्वाचे...

भाजप कार्यकर्त्यांचा 'युती तोडा'चा नारा!

छत्रपती संभाजीनगर -छत्रपती संभाजीनगरमध्ये आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर 'कीज हॉटेल' येथे भाजप आणि शिवसेनेच्या नेत्यांची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली असून, या बैठकीनंतर महायुतीची अधिकृत घोषणा करण्यात आली आहे. यापूर्वी महानगरपालिका निवडणुकीत तब्बल 12 बैठका होऊनही शेवटच्या क्षणी युती तुटली होती, ज्यामध्ये भाजपने मोठे यश मिळवले होते मात्र शिवसेनेला अपेक्षित यश मिळाले नव्हते. आता पुन्हा एकदा दोन्ही पक्षांनी एकत्रित निवडणुका लढवण्याचा निर्णय घेतला असला, तरी या घोषणेनंतर भाजप कार्यकर्त्यांनी आक्रमक पवित्रा घेतल्याचे पाहायला मिळत असून, मागील कटू अनुभवांच्या पार्श्वभूमीवर या नव्या युतीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.भाजप नेते व मंत्री अतुल सावे, खासदार भागवत कराड, आमदार संजय केनेकर आणि शिवसेनेचे पालकमंत्री संजय शिरसाठ, खासदार संदिपान भुमरे, आमदार रमेश बोरणारे, आमदार संजना जाधव यांच्या उपस्थितीत पार पडलेल्या बैठकीत महायुतीची अधिकृत घोषणा करण्यात आली. मात्र या निर्णयामुळे वैजापूरमधील भाजप कार्यकर्त्यांमध्ये तीव्र असंतोष पसरला आहे.

नाशिकच्या आरोग्य विज्ञान विद्यापीठ परिसरात 'पक्षी गणना' संपन्न

मुंबई-महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ आणि अरण्यानी बायोकन्झरवेशन सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठ परिसरात आयोजित 'जैवविविधता सर्वेक्षण व पक्षी गणना' शिबिर उत्साहात पार पडले. या सर्वेक्षणाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे, नाशिकमध्ये पहिल्यांदाच 'ह्युम्स वॉर्बलर' (Hume's Warbler) हा अत्यंत दुर्मिळ पक्षी आढळून आला आहे. समुद्रसपाटीपासून 3,500 मीटर उंचीवर, विशेषतः काराकोरम ते मंगोलियातील पर्वतीय जंगलांत आढळणाऱ्या या पक्षाची नोंद नाशिकमध्ये झाल्याने पक्षीप्रेमींमध्ये आनंदाचे वातावरण आहे. या उपक्रमाबाबत माहिती देताना विद्यापीठाचे परीक्षा नियंत्रक डॉ. संदीप कडू म्हणाले की, आरोग्य विद्यापीठ हे केवळ शिक्षणाचे केंद्र नसून निसर्ग संवर्धनासाठीही तितकेच सजग आहे. या शिबिराच्या माध्यमातून संकलित केलेला वैज्ञानिक डेटा पर्यावरण साक्षरता वाढवण्यासाठी अत्यंत महत्त्वाचा ठरेल. तर, वित्त व लेखाधिकारी बोधिकिरण सोनकांबळे यांनी या उपक्रमाला शाश्वत भविष्याकडे टाकलेले एक पाऊल असल्याचे सांगत, पक्ष्यांचा अधिवास टिकवणे ही काळाची गरज असल्याचे अधोरेखित केले.50 प्रजाती आणि 270 पक्ष्यांची नोंद अरण्यानी बायोकन्झरवेशन सोसायटीचे सल्लागार सतीश गोगटे यांनी सांगितले की, या सर्वेक्षणात सुमारे 50 प्रजातींचे 270 पक्षी आढळून आले आहेत. विद्यापीठ परिसरात पक्ष्यांसोबतच कीटक आणि सरपटणाऱ्या प्राण्यांचीही मोठी जैवविविधता आहे. या पक्षीगणनेची सर्व माहिती 'ई-बर्ड' (e-Bird) या जागतिक ॲपवर अद्ययावत करण्यात आली असून, ती जगभरातील अभ्यासकांसाठी उपयुक्त ठरणार आहे.या प्रसंगी विद्यापरिषद सदस्य डॉ. अजित फुंदे, जनसंपर्क अधिकारी डॉ. स्वप्नील तोरणे यांसह विद्यापीठाचे कर्मचारी आणि निसर्गप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मालेगाव महापालिकेत काँग्रेसची हुशार खेळी:इस्लाम पार्टीला पाठिंबा देत शिंदे गटाचा डाव उधळला; आता सत्ता स्थापनेचा मार्ग मोकळा

दिव्य वतन /वृत्तसेवा

मालेगाव -काँग्रेसने मालेगाव महापालिकेत इस्लाम पार्टीला पाठिंबा देत सत्ता स्थापनेचा मार्ग मोकळा केला आहे. काँग्रेसच्या या हुशार खेळीमुळे येथे सत्ता स्थापन करण्याचा शिंदे गटाचा प्रयत्न उधळला गेला आहे.

मालेगाव महापालिकेत इस्लाम पार्टीला सर्वाधिक 35 जागा निवडून आल्या आहेत. येथे एमआयएमला 21, तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील सत्ताधारी शिवसेनेला 18 जागांवर समाधान मानावे लागले. काँग्रेसला अवघ्या राज्याचे लक्ष लागलेल्या या महापालिकेत अवघ्या 3 जागा मिळाल्या, तर समाजवादी पार्टीच्या खिशात 5 जागा गेल्या. येथे कोणत्याही पक्षाला स्पष्ट बहुमत मिळाले नसल्यामुळे शिंदे गटाने एमआयएमला हाताशी धरून सत्ता स्थापन करण्याचा प्रयत्न सुरू केला होता. पण काँग्रेसने आज इस्लाम पार्टीला पाठिंबा जाहीर करून सत्ता स्थापन करण्याचा मार्ग मोकळा केला.

समाजवादी पार्टीने यापूर्वीच इस्लाम पार्टीला पाठिंबा जाहीर केला आहे. यामुळे तिन्ही पक्षांचे मिळून 43 नगरसेवक झाले आहेत. यामुळे मालेगाव महापालिकेत कुणाची सत्ता येणार? हा प्रश्न निकाली निघाला आहे. काँग्रेसने अवघ्या 3 जागा असतानाही एमआयएम व शिंदे गटाला सत्तेपासून दूर ठेवण्यासाठी हा डाव टाकला आहे.दुसरीकडे, इस्लाम पार्टीने स्थिर प्रशासन देण्यासाठी एमआयएमचा पाठिंबा मिळवण्याचाही प्रयत्न सुरू केला आहे. या प्रकरणी इस्लाम पार्टीच्या शिष्टमंडळाने एमआयएमचे आमदार मुफ्ती इस्माईल यांची भेट घेऊन पाठिंबा देण्याची मागणी केली. त्यावर दोन्ही पक्षांत साधक-बाधक चर्चा झाल्याची माहिती आहे. पण अद्याप एमआयएम इस्लाम पार्टीला पाठिंबा देणार की विरोधी बाकावर बसणार? हे स्पष्ट झालेनाही. पण काँग्रेसच्या पाठिंब्यामुळे मालेगावच्या सत्तेच्या चाव्या इस्लाम पार्टीच्या हातात गेल्याचे स्पष्ट झाले आहे.

उल्लेखनीय बाब म्हणजे एमआयएमचे प्रदेशाध्यक्ष इम्तियाज जलील यांनी मालेगावात सत्ता स्थापन करण्यासाठी शिंदे गटाने आपल्याशी संपर्क साधल्याचा दावा करून एकच खळबळ उडवून दिली होती. शिंदे गटाने मालेगावात एमआयएमला पाठिंबा देण्यासंबंधीचा प्रस्ताव दिला होता. पण आम्ही तो फेटाळून लावला, असे ते म्हणाले होते. हिंदुत्त्वाचे राजकारण करणाऱ्या शिंदे गटाने एमआयएमपुढे मैत्रीचा हात पुढे केल्यामुळे त्याची जोरदार चर्चा राज्याच्या राजकारणात रंगली होती.

SC चा एक निर्णय अन् शिंदे गट भाजपात विलीन होईल शिंदेंचे नेते ठाकरेंकडे परत जातील, मूळ शिवसेना अधिक ताकदवान होईल - सरोदे

दिव्य वतन /वृत्तसेवा

मुंबई - शिवसेना नाव व धनुष्यबाण या पक्षचिन्हावर उद्या सुप्रीम कोर्टात सुनावणी होणार आहे. वकील असीम सरोदे यांनी उद्याच्या सुनावणीत सुप्रीम कोर्टाने एकनाथ शिंदेंकडून पक्ष व पक्षचिन्ह काढून घेतले तर तर त्यांचे महत्त्व कमी होऊन उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वातील मूळ शिवसेना अधिक बलवान होणार असल्याचा दावा केला आहे.

विशेषतः शिवसेनेचे मॅटर सुप्रीम कोर्टात 37 व्या क्रमांकावर असल्यामुळे ते सुनावणीसाठी रिच होणे कठीण असल्याचेही ते यावेळी म्हणालेत. त्यामुळे उद्या सुप्रीम कोर्टात या प्रकरणी सुनावणी होणार किंवा नाही याविषया साशंकता आहे.

शिवसेना पक्षाचे नाव व धनुष्यबाण या निवडणूक चिन्हावर उद्या सर्वोच्च न्यायालयात अंतिम सुनावणी

सुरू होणार आहे. या प्रकरणी सलग 2 दिवस युक्तिवाद ऐकून घेतले जाणार आहेत. सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या नेतृत्वाखालील खंडपीठ या महत्त्वपूर्ण प्रकरणावर सुनावणी घेणार आहे. नोव्हेंबरमध्ये झालेल्या सुनावणीवेळी न्यायालयाने उद्यापासून सुरू होणारी सुनावणी अंतिम असल्याचे स्पष्ट केले होते. त्यामुळे आता हे प्रकरण लवकरच निकाली निघणार हे स्पष्ट झाले आहे. या पार्श्वभूमीवर असीम सरोदे यांनी एका पोस्टद्वारे या खटल्यावर प्रकाश टाकला आहे.

असीम सरोदे म्हणाले, शिवसेना नाव आणि धनुष्यबाण हे पक्षचिन्ह. सुनावणीची तारीख उद्या सुप्रीम कोर्टात आहे, पण 37 नंबरचे मॅटर सुनावणीसाठी reach होणे कठीण आहे. आता लोकांचा नवीन प्रश्न - जर एकनाथ शिंदेंकडून पक्ष चिन्ह व शिवसेना नाव काढून घेतले तर मुंबई महापालिकेत काय होईल? मला वाटते शिंदेसेना भाजपमध्ये विलीन होईल व एकनाथ शिंदे यांचे राजकीय महत्व एकदम कमी होईल.

शिंदेसेनेतील अनेकजण उद्धव ठाकरेंकडे स्वगृही परत जातील व मूळ शिवसेना अधिक ताकदवान होईल.

उद्धव आणि राज ठाकरे मिळून मुंबई महापालिकेतील राजकारण फिरवू शकतील. सर्वोच्च न्यायालयातील एका निर्णयामुळे सुरु झालेला खेळ सर्वोच्च न्यायालयाच कधीतरी संपवेल, असे असीम सरोदे यांनी म्हटले आहे.

भाजप स्वत:च्याच नगरसेवकांचे फोन टॅप करतंय

शिंदेंकडून ब्लॅकमेलिंगचा प्रयत्न, त्यांना महापौरपदात नाही, स्थायी समितीत रस - संजय राऊत

दिव्य वतन /वृत्तसेवा

मुंबई - भाजप आपल्याच नगरसेवकांवर पाळत ठेवून त्यांचे फोन टॅप करत असल्याचा खळबळजनक दावा ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी आज माध्यमांशी बोलताना केला. यावेळी बोलताना त्यांनी एकनाथ शिंदे यांनाही बोचरा टोला लगावला आहे. एकनाथ शिंदे ब्लॅकमेल करून स्थायी समिती पदरात पाडून घेण्याच्या प्रयत्नात आहेत. त्यांना महापौरपदापेक्षा स्थायी समितीत जास्त रस आहे, असे ते म्हणाले.

मुंबई महापौरपदासाठी कुठल्याही परिस्थितीत तडजोड करू नका. महापौरपदावरचा दावा सोडू नका, असा आदेश भाजपच्या दिल्ली हायकमांडकडून देवेंद्र फडणवीसांना गेल्याची माहिती आहे. यावरही संजय राऊत यांनी प्रतिक्रिया दिली. ते म्हणाले, माझ्या माहितीप्रमाणे भाजपचा महापौरपदावरील दावा सुटणार नाही. पण अशाप्रकारे ब्लॅकमेक करून काही दुसरे पदरात पाडून घेता येईल का? असा शिंदेंचा विचार आहे. त्यांना स्थायी समिती रस असतो. जिथे पैशांचे किंवा ठेकेदारीचे घोटाळे केले जातात, तिथे या लोकांना रस आहे, असे संजय राऊत म्हणालेत.

एकनाथ शिंदेच्या शिवसेनेने हॉटेल पॉलिटिक्स सुरू केलंय, तर भाजपने त्यांच्या नगरसेवकांना १० दिवस मुंबई न सोडण्याचे फर्मान काढले आहे. यावरही संजय राऊत यांनी प्रतिक्रिया दिली. ते म्हणाले, भाजपच्या प्रत्येक नगरसेवकावर वॉचडॉग ठेवलेले आहेत. त्या त्या भागातील कार्यकर्त्यांना नगरसेवकांवर लक्ष ठेवण्यात सांगितले आहे. ते घरी असले, तरी त्यांच्या लक्ष ठेवले जात

आहे. भाजपचे नगरसेवक आणि हॉटेलमध्ये असलेल्या शिंदेंच्या नगरसेवकांचे फोन टॅप केले जात आहेत, असा दावा संजय राऊत यांनी केला. रश्मी शुक्ला नसल्या, तरी प्रक्रिया तीच आहे. भाजप आपला स्वत:च्या नगरसेवकांचे फोन टॅप करत आहे, असेही संजय राऊत म्हणाले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दावोस दौऱ्यावरही संजय राऊत यांनी टीका केली. दावोसमध्ये गुंतवणुकीवर चर्चा कमी सुरू आहे. मुख्यमंत्री आणि उद्योगमंत्री यांच्यात मुंबईच्या महापौरपदावरच चर्चा सुरू असते. त्यामुळे यावेळेला महाराष्ट्रात गुंतवणूक कमी येणार आहे. कारण सगळ्यांची गुंतवणूक मुंबई महापालिकेच्या महापौरपदाच्या संदर्भात होत आहे, असे संजय राऊत म्हणाले.पक्षांतराच्या मुद्द्यावर बोलताना राऊत म्हणाले की, नगरसेवक एखाद्या पक्षावर किंवा चिन्हावर निवडून आला असेल, तर पुढील पाच वर्षे त्याच पक्षात राहून काम करणे गरजेचे आहे.

जर त्याला पक्षांतर करायचे असल्यास, आधी पदाचा राजीनामा दिला पाहिजे. पण भाजप आणि शिंदेंच्या बाबतीत तसे दिसत नाहीये. ते दुसऱ्या पक्षात निवडून आलेले आमदार, खासदार, नगरसेवक यांना विकत घेण्याचा प्रयत्न करतात. यालाच मतदारांची प्रतारणा म्हणतात. हा मतदारांचा विश्वासघात आहे.

भाजपने मदत न केल्यामुळे माझा पराभव:शिंदे गटाच्या सदा सरवणकर यांच्या मुलाचा आरोप; भाजपच्या एका विशिष्ट टोळीवर साधला निशाणा

दिव्य वतन /वृत्तसेवा

मुंबई- महापालिकेच्या निवडणुकीत पराभवाची चव चाखावी लागलेल्या शिंदे गटाच्या समाधान सरवणकर यांनी भाजपवर थेट निशाणा साधला आहे. भाजपने मदत न केल्यामुळे माझा पराभव झाला. माझ्या विरोधात विरोधी 2 पक्षांच्या पक्षप्रमुखांची मुले प्रचार करत होती. पण भाजपच्या एकाही नेत्याने मला मदत केली नाही. उलट माझा प्रचार करू नका असा अपप्रचार ते करत होते, असे सरवणकर यांनी म्हटले आहे.

समाधान सरवणकर हे शिंदे गटाचे बडे नेते तथा सिद्धिविनायक ट्रस्टचे अध्यक्ष सदा सरवणकर यांचे सुपुत्र आहेत. ते मुंबई महापालिकेच्या प्रभाग क्रमांक 194 मधून निवडणुकीच्या रिंगणात होते. ठाकरे गटाच्या निशिकांत शिंदे यांनी त्यांचा पराभव केला. त्यानंतर आता त्यांनी आपल्या पराभवासाठी भाजपला जबाबदार धरले आहे. ते म्हणाले, माझ्या प्रभागात माझ्या विरोधात 4-5 आमदार प्रचार करत होते. विरोधी बाकावरील 2 पक्षांच्या पक्षप्रमुखांची मुले माझ्या मतदारसंघात प्रचारात उतरली होती. त्यांचे मुख्य टार्गेट मी होतो. त्यानंतरही मतदार माझ्यासोबत उभे राहिले.

पण माहीम विधानसभेत मला भाजपची कोणतीही मदत झाली नाही. भाजपचे विशिष्ट एक पदाधिकारी होते. त्यांनी सर्वांना सांगितले की, यांना मदत करू नका. आपल्याला काहीतरी आले असल्याचा मेसेज त्यांनी व्हॉट्सएपवरून व्हायरल केला. त्यामुळे आम्हाला माहीममध्ये कुणीही मदत केली नाही. व्हॉट्सएप चॅटमध्येही लिहिण्यात आले होते की, आपल्याला यांचे (समाधान सरवणकर) काम करायचे नाही. आपल्याला त्यांचा पराभव करायचा

आहे, असे ते म्हणाले.

समाधान सरवणकर पुढे म्हणाले, लोकसभा व विधानसभा निवडणुकीतही भाजपची एक विशिष्ट टोळी महायुतीचा उमेदवार कसा पराभूत होईल यासाठी काम करत होती. त्यानंतर यंदाच्या महापालिका निवडणुकीतही या टोळीने भाजपच्या शीतल गंभीर यांचाही पराभव कसा होईल यासाठी काम केले. पण शीतल गंभीर विजयी झाल्या, तर प्रिया सरवणकर यांचा पराभव झाला. या पराभवामागेही भाजपची हीच टोळी कार्यरत होती.भाजप अशा पद्धतीने काम करेल याची कल्पना आम्हाला नव्हती. हीच टोळी भाजप नेते आशिष शेलार यांच्याविषयीही घाणेरड्या भाषेत बोलत होती. या टोळीने पक्षाचा आदेश डावून काम केले. त्यामुळे आम्ही या प्रकरणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन आमची बाजू मांडणार आहोत. पक्षाचे लेबल असल्यामुळे त्या व्यक्तीचे ऐकले जात आहे. पण त्यांनी निवडणुकीत आम्हाला कोणतीही मदत केली नाही. या व्यक्तीविषयी आम्ही कळवण्याच्या अगोदर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने वरिष्ठांना कळवले होते, असा दावाही समाधान सरवणकर यांनी केला आहे.

जनतेऐवजी पंचतारांकित हॉटेल्सना प्राधान्य? अमित ठाकरे संतप्त

दिव्य वतन /वृत्तसेवा

मुंबई - राज्यातील महानगरपालिका निवडणुकांचे निकाल जाहीर झाल्यानंतर लोकप्रतिनिधींनी थेट आपल्या प्रभागात जाऊन मतदारांचे आभार मानावेत, स्थानिक प्रश्नांची दखल घ्यावी आणि जनतेशी संवाद साधावा, अशी लोकशाहीतील अपेक्षा असते. मात्र, सध्या राज्यातील चित्र याच्या नेमकं उलट असल्याचा आरोप करत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेते अमित ठाकरे यांनी सत्ताधारी तसेच इतर पक्षांच्या नेत्यांवर जोरदार शब्दांत टीका केली आहे. निवडणूक संपल्यानंतर जनतेऐवजी पंचतारांकित हॉटेल्सना प्राधान्य दिलं जात असल्याचा टोला त्यांनी लगावला आहे. सोशल मीडियावर केलेल्या पोस्टमधून अमित ठाकरे यांनी सध्याच्या राजकीय परिस्थितीवर उपरोधिक शैलीत प्रहार केला. त्यांनी म्हटलं आहे की, जनतेने निवडून दिलेले नगरसेवक आणि लोकप्रतिनिधी आज आपल्या प्रभागात कुठेच दिसत नाहीत. निवडणूक जिंकल्यानंतर लोकांच्या प्रश्नांसाठी रस्त्यावर उतरण्याऐवजी हेच प्रतिनिधी फाईव्ह स्टार हॉटेल्सच्या बंद दाराआड 'आनंदाने कैद' असल्याचं चित्र असल्याचा आरोप त्यांनी केला.

महापौर पदावर शिवसेनेचा दावा:शिंदे म्हणाले- कार्यकर्त्यांची इच्छा, बाळासाहेबांच्या जन्मशताब्दीनिमित्त शिवसैनिकच महापौर व्हावा

दिव्य वतन /वृत्तसेवा

मुंबई - महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सोमवारी बृहन्मुंबई महानगरपालिका (BMC) महापौर पदावर शिवसेनेच्या दाव्याचे संकेत दिले आहेत. ते म्हणाले की, 23 जानेवारीपासून शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षाची सुरुवात होत आहे. या निमित्ताने BMC मध्ये शिवसेनेचा महापौर असावा अशी शिवसैनिकांची इच्छा आहे.

मात्र, शिंदे यांनी हे देखील स्पष्ट केले की, शिवसेना जनादेशाच्या विरोधात कोणताही निर्णय घेणार नाही. त्यांनी आठवण करून दिली की, BMC निवडणूक शिवसेना आणि भाजपने युतीत लढवली होती. ज्या महानगरपालिकांमध्ये शिवसेना आणि भाजपने एकत्र निवडणूक लढवली आहे, तिथे महायुतीचाच महापौर होईल.

महाराष्ट्रामध्ये BMC सह 29 महानगरपालिकांमध्ये 15 जानेवारी रोजी निवडणुका झाल्या होत्या आणि 16 जानेवारी रोजी निकाल लागला होता. BMC च्या 227 जागांपैकी भाजपला 89 आणि शिंदे गटाला 29 जागा मिळाल्या होत्या. महापौरपदासाठी बहुमताचा आकडा 114 आहे. यासाठी भाजपला शिंदे गटाच्या 25 नगरसेवकांच्या पाठिंब्याची गरज असेल.

निकालानंतर शिवसेनेने आपल्या 29 नगरसेवकांना वांद्रे येथील ताज लँड्स एंड हॉटेलमध्ये थांबवले आहे. मात्र, पक्षाचे म्हणणे आहे की, नगरसेवकांसाठी हॉटेलमध्ये ओरिएंटेशन कार्यशाळा आयोजित केली जात आहे, जेणेकरून त्यांना देशातील सर्वात श्रीमंत महानगरपालिका असलेल्या बीएमसीच्या कामकाजाची माहिती दिली जाईल.29 महानगरपालिकांमध्ये महापौरपदासाठी 22 जानेवारी रोजी सोडत काढण्यात येईल. यामध्ये हे निश्चित होईल की पद खुल्या प्रवर्गासाठी, अनुसूचित जाती/जमातीसाठी, इतर मागासवर्गीयांसाठी किंवा महिलांसाठी आरक्षित राहील. प्रवर्ग निश्चित होताच त्याच दिवशी किंवा दुसऱ्या दिवशी अधिसूचना जारी केली जाईल.

त्यानंतर सात दिवसांची नोटीस अनिवार्य असल्याने महापौर निवडणूक 29 किंवा 30 जानेवारी रोजी होण्याची शक्यता आहे. जर अधिसूचना 23 जानेवारी रोजी जारी झाली, तर मतदान 30 किंवा 31 जानेवारी रोजी घेतले जाऊ शकते. मुख्यमंत्री फडणवीस 24 जानेवारी रोजी स्वित्झर्लंडहून परत येतील.शिवसेना (UBT) चे खासदार संजय राऊत यांनी सोमवारी दावा केला की, शिंदे गटानंतर भाजपही आपल्या नगरसेवकांना सुरक्षित ठिकाणी हलवण्याची योजना आखत आहे. राऊत म्हणाले- शिंदे यांनी आपल्या नगरसेवकांना आधीच पंचतारांकित हॉटेलमध्ये पाठवले आहे. प्रश्न आहे- कोण कोणाला घाबरत आहे?

शिंदे गटाचे नेते संजय निरुपम यांनी स्पष्टपणे सांगितले की, मुंबईचा पुढील महापौर महायुतीमधूनच होईल आणि शिवसेना (यूबीटी) च्या महापौराची कोणतीही शक्यता नाही.शिवसेना (यूबीटी) चे प्रवक्ते हर्षल प्रधान यांनी आरोप केला की, भाजप आणि शिंदे सत्तेसाठी भुकेले आहेत आणि

त्यांनी त्यांच्या अंतर्गत लढाईत उद्धव गटाला ओढू नये.

संपूर्ण विरोध पक्ष एकत्र आला तरीही 8 नगरसेवक कमी, मुंबई काँग्रेसमध्ये 'गृहयुद्ध'

शिवसेना (यूबीटी) 65 प्रभागांसह दुसऱ्या स्थानावर राहिली, तर मनसेने 6 जागा आणि राष्ट्रवादी काँग्रेस (एसपी) ला 1 जागा मिळाली आहे. या तिघांच्या एकूण जागा 72 आहेत. काँग्रेसने 24 प्रभागांमध्ये, ओवैसींच्या पक्षाने 8 जागांवर आणि समाजवादी पक्षाने 2 प्रभागांमध्ये विजय मिळवला आहे. जर संपूर्ण विरोधी पक्ष एकत्र आला तरी एकूण आकडा 106 होईल. म्हणजे बहुमतापेक्षा 8 जागा कमी.